## प्रकरण १

# स्त्रीवाद

## ( Feminism )

स्त्रीवाद ही प्रामुख्याने पाश्चात्त्य विचारधारा आहे. मानवी इतिहासाच्या वाटचालीत स्त्री म्हणून स्वतंत्र अस्तित्व न मानता तिच्याकडे पुरुषकेंद्रित दृष्टिकोणातून पाहिले गेले. त्यामुळे संस्कृतीच्या प्रगतीमध्ये स्त्रीला दुय्यम स्थान मिळाले. कारण स्त्री ही कोणातरी पुरुषाची मुलगी, बहीण, पत्नी, माता, आजी म्हणून जीवन जगत होती. वंशनिर्मिती व वंशसातत्य यातील स्त्रियांची भूमिका नेहमीच 'मादी' म्हणून राहिली. कारण मुलाला जन्म देण्याची व संगोपनाची जबाबदारी तिच्यावर पण पिता म्हणून पुरुषाचेच नाव लागले. जवळजवळ सर्व समाजात पुरुषांच्या तुलनेत स्त्रीचे स्थान भिन्न व दुय्यम असल्यामुळे पुढेपुढे सवय होऊन सर्वांनाच ते नैसर्गिक व योग्य वाटू लागले.

कारखानदारी, यंत्रयुग आणि भांडवलशाही हे इतिहासाचे टप्पे मागे टाकून आपण भूतकाळात गेलो तर स्त्रियांच्या दुय्यम व कनिष्ठ दर्जाचे अनेक पुरावे मिळू शकतात. त्यामुळे पुरुषांच्या बरोबरीने जग घडविण्याचा अधिकार स्त्रियांना प्राप्त व्हावयाचा असेल तर स्त्री-पुरुष विषमता कशी रुजत गेली हे अभ्यासणे महत्त्वाचे ठरते. अशा अभ्यासामुळे स्त्रीचे दुय्यमत्व हे नैसर्गिक नसून इतिहासात अनेक गोष्टी घडविल्या जातात. तसेच ते घडविले गेले आहे हा विचार स्पष्ट होतो. याच विचाराच्या आधारावर स्त्रीवादी दृष्टिकोणातून भूतकाळाची नवी रचना व पुनर्लेखन करणे शक्य होते. यालाच आपण 'Reconstruction and Rewriting of the past with the view of Feminist perspective' असे म्हणतो.

### स्त्रीअभ्यासविषयक संकल्पना

सर्व जगभर या ज्ञानशाखेविषयी चर्चा सुरू आहे. याचा साधा सरळ अर्थ म्हणजे 'स्त्रियांविषयींचा अभ्यास'. कन्या, पत्नी, माता, भगिनी, प्रेयसी इत्यादी भूमिकांतून स्त्रियांचे समाजातील स्थान, समस्या, आरोग्य, शिक्षण, गरजा, आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक, राजकीय क्षेत्रांत समानतेसाठी त्यांनी केलेला संघर्ष या सर्वांचा अभ्यास स्त्रीकेंद्रित "Women Centred' या अभ्यासविषयाच्या कक्षेत येतो. अर्थात, या

विषयाचा अभ्यास चळवळींच्या माध्यमातूनही करता येतो. त्यामुळे स्त्रीअभ्यासात संशोधन व प्रत्यक्ष आंदोलन यातील विरोध कमी होऊन दोहोंत एक सक्रिय नाते निर्माण होते.

## स्त्रीवाद व्याख्या (Definition of Feminism)

मानवी इतिहासाच्या जडणघडणीत पुरुषांपेक्षा स्त्रियांना दुय्यम स्थान का आणि कसे आले याचे विश्लेषण, स्पष्टीकरण व ते नष्ट करण्यासाठी अवलंबण्याचे मार्ग, आव्हाने, चळवळी यांची मांडणी व अभ्यास म्हणजे स्त्रीवाद होय.

### स्त्रीवादी सिद्धांत (Feminist Theories)

याचा साधारण अर्थ असा केला जातो की, स्त्रियांच्या दुय्यमत्वाचे चिकित्सक स्पष्टीकरण देणारी ज्ञानशाखा. पुरुषशाही व पुरुषसत्ताक जीवनपद्धती हा अशा सिद्धांताचा मूळ पाया आहे. स्त्रीवादामधील पुरुषप्रधानता ही अतिशय महत्त्वाची संकल्पना आहे.

**लिंगभेद (Gender)** : विश्वातील सर्व प्राण्यांप्रमाणेच मनुष्यप्राण्यामध्येही स्त्री व पुरुष असे भेद आहेत. मानवी वंशसातत्यासाठी हे दोन्ही गट आवश्यक असतात. या दोहोंतील वेगळेपण ओळखण्याचा आधार लिंगभेद हा असतो. यालाच समाजशास्त्रीय भाषेत स्त्री-पुरुष भूमिका (Sex Role) म्हणून ओळखले जाते.

**पुरुषप्रधानता (Patriarchy)** : कुटुंबातील घटक व्यक्तीवर कर्त्या पुरुषाची अधिसत्ता असणे म्हणजेच पुरुषप्रधानता होय. अशा कुटुंबाचे वर्णन करण्यासाठी हा शब्द प्रथम वापरला गेला. या शब्दास हिंदीत - पितृसत्ता, उर्दूत - पिदरशाही, बंगालीत - पितृतंत्र, तर इंग्रजीत Patriarchy असे संबोधले जाते.

अशा प्रकारची कुटुंबपद्धती भारत, चीन, जपान व आशियाई देशांत तसेच प्राचीन युरोपमध्ये दिसते. या पद्धतीने मानवी समाजव्यवस्थेवर प्रभाव टाकला आहे. मानवजातीने इतिहास काळात स्वीकारलेले आदर्श, मूल्ये, प्रमाणके ही पुरुषांना अनुकूल राहिली. त्यामुळे कुटुंबातील स्त्रीच्या दुय्यम स्थानामुळे पुरुषाच्या तुलनेत तिचा दर्जा कमी राहिला. समाजकारण, राजकारण, धार्मिक जीवन, अर्थव्यवस्था या सर्वांवर याचा परिणाम दिसतो. भारतामध्ये खासी, गारो यांसारख्या काही जमाती व केरळमधील नायर जमात सोडल्यास सर्व जातींमध्ये पितृसत्ताक कुटुंबपद्धती आहे. आर्य पितृसत्ताक कुटुंबपद्धतीचे भोक्ते असल्याने व त्यांच्या संस्कृती प्रसारामुळे एतद्देशीय कुटुंबपद्धती भारतात ऱ्हास पावली असावी असाही तर्क मांडला जातो.

१९६० नंतर मात्र हा शब्द साधारणपणे पुरुषी वर्चस्व किंवा स्त्रियांना पुरुषी वर्चस्वाखाली ठेवणारे सत्तासंबंध अशा अर्थी वापरला जातो. अशा प्रकारे स्त्रीला

केवळ दुय्यम स्थान देणारी जी रचना आहे तिचे लक्षण सांगणारा योग्य शब्द म्हणून स्त्रीवाद्यांच्या दृष्टीने या संज्ञेला महत्त्व प्राप्त झाले. स्त्रीसंबंधी समाजात अगर कुटुंबात केला जाणारा भेदभाव, दुजाभाव, अनादर, अपमान, बंधने व नियंत्रणे, शोषण, दमन, कामाच्या ठिकाणचा हिंसाचार असे दुय्यमतेचे वेगवेगळे प्रकार आहेत.

**केट मिलेटने** (Kate Millette) **'सेकंड व्हेव ऑफ फेमिनिझम'** या पुस्तकात या संज्ञेचा अर्थ 'कुटुंब व समाजव्यवस्थेतील पुरुष व स्त्रिया यामधील उतरंडीची रचना' असा केला आहे. या व्यवस्थेत पुरुषच प्रमुख असतो. राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक जीवनात स्त्रियांवर त्यांचा कायदा चालतो.

स्त्रियांच्या दुय्यमत्वाच्या उगमाची कारणमीमांसा स्पष्ट करण्यासाठी प्रथम पुरुषशाही या संकल्पनेचा वापर सुरू झाला. स्त्रियांचे भांडवलशाहीतून निर्माण होणारे दुय्यमत्व व त्यातील अर्थ स्पष्ट होण्यासाठीही ही संकल्पना वापरली गेली. तसेच या कल्पनेला चिरस्थायित्व कसे लाभले याचे स्पष्टीकरण शोधण्यासाठी मनोविश्लेषणात्मक सैद्धांतिकांनी 'पुरुषशाही' ही संकल्पना वापरली. वरील तीनही ठिकाणी वापरलेल्या या संज्ञेने पुरुषशाहीमध्ये अंतर्गतरित्या सत्तासंबंधाचे पुनर्निर्माण कसे होते, पुरुषशाहीचे संस्थात्मक नियोजन कसे होते याचे निरनिराळे अर्थ लावले.

स्त्रीवादाने पुरुषप्रधानता हा स्त्रीला दुय्यम ठरविणारा प्रमुख मुद्दा आहे अशी मांडणी केली. पुरुषप्रधानतेच्या मुद्याच्या साहाय्याने स्त्रियांच्या दडपणुकीच्या प्रकारांचे मर्म शोधणे, इतिहास, कायदा, धर्म, साहित्य, कला, सामाजिक चालीरीतींचे विश्लेषण करणे ही नवी दृष्टी स्त्रीवादाने विकसित केली. बऱ्याच वेळा पुरुषप्रधानता हाच एकमेव शत्रू, ही टोकाची स्त्रीवादी भूमिका टाळून स्त्रियांच्या दडपणुकीचे परिणाम इतर गोष्टींशी जोडण्याचा प्रयत्नही अनेक स्त्रीवाद्यांनी केला.

## स्त्रीअभ्यासाचा प्रारंभ व विकास

स्त्रीअभ्यासाची सुरुवात पाश्चिमात्य देशात मुख्यतः अमेरिकेत झाली आणि तेथून ती विकसनशील देशात येऊन पोहोचली. पाश्चिमात्य स्त्रीअभ्यासकांच्या संकल्पनांमध्ये साधर्म्य तर विकसनशील देशात स्त्रीअभ्यासाच्या संकल्पना, व्याप्ती व हेतू याबाबत फारच मतभिन्नता आढळते. भारतासारख्या विकसनशील देशांतील स्त्रियांचे प्रश्न हे पाश्चिमात्य देशातील स्त्रियांच्या प्रश्नांपेक्षा निश्चित वेगळे आहेत. कारण भारतीय स्त्रियांचे समाजातील स्थान व प्रश्न यावर बालविवाह, रूढी, चालीरीती, अशिक्षितपणा, जातीयवादी, धर्मवादी, हिंसा यांसारख्या अनेक घटकांचा प्रभाव आहे. पाश्चिमात्य स्त्रीवादी अभ्यास व चळवळी यांच्या प्रगतीसाठी जगातील अनेक घडामोडींची पार्श्वभूमी महत्त्वाची ठरली.

१९ व्या शतकापासूनच मतदानाच्या हक्कासाठी इंग्लंड व अमेरिकेतील स्त्रियांनी

चळवळ सुरू केली. १९२० च्या मतदानाच्या हक्काने या चळवळीचा पहिला टप्पा संपला. १९२० ते १९६० ही ४० वर्षे चळवळीच्या दृष्टीने थंड गेली. कारण, युद्धोत्तर पुनर्रचनेत सारे जग व्यग्र होते. पण १९६० नंतर अमेरिकेतील युद्धविरोधी चळवळी, विद्यार्थी चळवळी, काळ्यांच्या चळवळी, निग्रो गुलामांच्या चळवळी यांचा प्रभाव वाढला. बेटी फ्रिडन, टी. जर्मेन गिअर, केट मिलेट, फायरस्टोन या स्त्रीवादी लेखिकांच्या लेखनाला महत्त्व मिळाले. त्यामुळे स्त्रियांनी गृहिणींची प्रतिमा नाकारून आवडीचे क्षेत्र निवडण्यासाठी बाहेर पडावे असे विचार बळावू लागले.

यातूनच रोजगार, शिक्षण, राजनीती, न्याय अशा सर्वच क्षेत्रांत लिंगभेदामुळे होणारा भेदभाव वाढला आहे याची जाणीव झाली. स्त्रियांचे वैवाहिक जीवनाबद्दलचे अनुभव, प्रसारमाध्यमांनी स्त्री देहाचे केलेले अवास्तव प्रदर्शन, दुय्यमत्वाची जाणीव यातून होणारे शोषण याबद्दल जागरूकता निर्माण झाली. परिणामी, स्त्रियांचा छळ, हिंसाचार यांसारखे प्रश्न स्त्रीवादी आंदोलनासमोर आले. त्यामुळे लिंगभेदाची पाळेमुळे, स्त्रीची दुरवस्था, दुबळेपणा, पितृसत्ताक पद्धतीचे मनोवैज्ञानिक विश्लेषण यांचा प्रभाव चळवळीवर पडला. या आणि सर्वच प्रश्नांबाबत सखोल विचार होण्याची आवश्यकता निर्माण झाली.

हे विचार हळूहळू भारतासारख्या विकसनशील देशातही येऊन पोहोचले. भारतातील सुशिक्षित व विचारवंतांनी आपली मते मांडण्यास सुरुवात केली. भारतातील महिलांच्या स्थितीचा व दर्जाचा अभ्यास व्हावा यासाठी १९७१ मध्ये एका राष्ट्रीय समितीचे गठन श्रीमती फुलरेणु गुहा यांच्या अध्यक्षतेखाली केले गेले. या समितीने १९७४ साली 'समानतेच्या दिशेने' (Towards Equality) हा अहवाल सादर केला. यामधून स्त्रियांच्या स्थितीबाबतची आरोग्य, शिक्षण, रोजगार, राजकीय सहभाग याविषयी धक्कादायक माहिती पुढे आली.

स्वातंत्र्यानंतर लगेचच भारतीय संविधानाने (१९५०) सर्वच क्षेत्रांत स्त्रियांना समान संधी दिली. ती फक्त आता अमलात येईल हा विचार प्रबळ होत असतानाच 'समानतेच्या दिशेने' (१९७४) या अहवालातील निष्कर्षाने समाजातील मूलभूत कल्पनांना धक्का बसला व भारतीय स्त्रियांच्या ढासळत्या स्थानाबद्दल चिंता करण्याइतपत परिस्थिती आहे हे सत्य पुढे आले. कारण १९५० ते १९७५ या कालखंडातील बरेच स्त्रीविषयक अभ्यास हे अभिजन वर्गापुरतेच मर्यादित राहिले होते. त्यामुळे भारतीय स्त्रीजीवनाचे सत्यस्वरूप १९७४ नंतर पुढे आले. ७ व्या पंचवार्षिक योजनेपासून ९ व्या योजनेपर्यंत अनेक सरकारी मान्यताप्राप्त स्त्रीअभ्यास केंद्रांची स्थापना झाली. यामुळे आय.सी.एस.एस.आर. (Indian Council of Scientific & Social Research) या भारतातील प्रमुख संशोधन संस्थेने निर्धन

स्त्रियांच्या सामाजिक दर्जाविषयक अभ्यासाला चालना दिली. १९७३ मध्ये मुंबईत एस.एन.डी.टी. या महिला विद्यापीठात पहिल्या स्त्री अभ्यासकेंद्राची स्थापना झाली. या सर्वांमुळे १९७० च्या दशकात भारतातील स्त्रीविषयक अभ्यासाची कवाडे उघडू लागली. यापूर्वी याविषयी अपवादात्मक लिखाण भारतात झाले होते हे नाकारता येत नाही.

याच वेळी 'मथुरा बलात्कार प्रकरण' (१९७९) घडले. पोलीस ठाण्यात आदिवासी स्त्रीवर बलात्कार झाल्याचे धक्कादायक सत्य बाहेर आले. 'रक्षकच भक्षक बनले' या विचाराने स्त्रियांच्या सामाजिक सुरक्षिततेचा प्रश्न पुढे आला व स्त्रियांचे स्वतंत्र गट संघटित होऊन स्त्री आंदोलने छेडली गेली. स्त्रीविषयक अभ्यास व स्त्री अन्यायाविरुद्धची आंदोलने एकाच वेळी सुरू झाली. यामुळे दोन महत्त्वपूर्ण गोष्टी घडल्या. (१) भारतीय समाजातील स्त्रियांच्या या दुर्दशेबद्दलचे तात्त्विक व सैद्धांतिक विश्लेषण करणे सुरू झाले. (२) स्त्रियांवरील अन्याय व अत्याचाराच्या व्यापकतेची जाणीव होऊ लागली. या घटनांना प्रसारमाध्यमांनी फार मोठा हातभार लावला. प्रामुख्याने हुंडाबळी, कौटुंबिक अत्याचार, स्त्री-आरोग्य, प्रसारमाध्यमातील स्त्रीदेहाचे विकृत प्रदर्शन याविरुद्ध अन्याय, मोर्चे, धरणे, जाणीव व जागृती अशा अनेक मार्गांनी उपक्रम राबवले गेले. सरकारलाही याची दखल घ्यावी लागली. स्त्री-विरोधी कृत्यांबद्दल कायदे करण्यासाठी स्त्रियांच्या चळवळीने लोकप्रतिनिधींवर दडपणे आणली.

याचाच एक परिणाम म्हणजे अनेक विद्याशाखांतील तज्ज्ञ विचारवंत एकत्र येऊ लागले. एप्रिल १९८१ मध्ये मुंबईत महिला अध्ययनविषयक राष्ट्रीय संमेलन आयोजित केले व त्यामध्ये 'अखिल भारतीय स्त्री परिषद' (All Indian Women's Studies Association) ची स्थापना झाली. अशाच संघटना अनेक राज्यांतून स्थापन झाल्या. विद्यापीठ अनुदान आयोगाने (U.G.C.) काही विद्यापीठांतून व महाविद्यालयांतून स्त्री अभ्यासकेंद्रे स्थापन करण्यास अनुदान देऊ केले. देशभर अशी ५४ केंद्रे आहेत. पुण्यात 'आलोचना', 'दृष्टी' तर मुंबईत 'अक्षरा' सारखी स्वायत्त 'स्त्रीअभ्यास केंद्रे' व 'माहिती संगणक केंद्रे' कार्यरत झाली. त्यामुळे स्त्री समस्याविषयक आंदोलनकर्ते व स्त्रीविषयक अभ्यासक यांना स्त्रीविषयक समस्या व आव्हाने यांची एकत्रित जाणीव व संघर्ष निवारणासाठी प्रयत्न करण्याची दिशा मिळू लागली.

### स्त्रीअभ्यासाची विशेषता

या अभ्यासामध्ये स्त्रीला कन्या, पत्नी, माता, बहीण या भूमिकांमुळे स्वतंत्र व्यक्ती म्हणून येणाऱ्या अनुभवांचा अभ्यास केला जातो. अशा स्त्रीकेंद्रित दृष्टिकोणातून स्त्रीजीवनाचा अभ्यास हे १९७० च्या दशकाचे फळ असले तरीही भूतकाळातील

घटनांसाठीही हा दृष्टिकोण वापरून इतिहासविषयक लिखाणाचे पुनर्लेखन केले जाऊ शकते. समाजशास्त्र, पर्यावरण, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र इत्यादी अनेक विषयांबरोबरच इतिहास विषयातील अभ्यासामुळे स्त्रियांना आजपर्यंत मिळालेल्या विषम वागणुकीबद्दल वाचा फोडता येते. आहार, आरोग्य, निर्णयस्वातंत्र्य या हक्कांबद्दल स्त्री कुटुंबात दुर्लक्षित का राहते याचा सांगोपांग विचार अशा अभ्यासातून केला जातो. उदा. 'वडिलांचे घर हे कधीच मुलीचे नसते' हा विचार मुलीच्या मनावर का ठसविला जातो याचे उत्तर शोधणे या अभ्यासामुळे शक्य होते. यामागे एकदा लग्न झाले की, माहेरच्या घरातील सर्व अधिकारांपासून तिला वंचित ठेवणे हे कारण असते.

स्त्रिया व काम यांचा स्वतंत्र विचार करणे गरजेचे आहे. शतकानुशतके स्त्रियांच्या घरगुती किंवा व्यवसायातील (शेती, बलुतेदारी) इत्यादी कामांना 'उत्पादकक्षम' म्हणून मान्यता दिली गेली नाही. कारण स्त्रियांनी केलेली ही कामे इतरांना (पुरुषांना) महत्त्वपूर्ण वाटलीच नाहीत. त्यामुळे अशा कामाचा मोबदला स्त्रियांना मिळाला नाही. स्त्री उपेक्षित राहिली आहे हे लक्षात आले नाही तर **'उपेक्षितांच्या इतिहासात'** (Subaltern History) मध्ये तिला स्थान मिळणारच नाही. स्त्रियांची मते पुरुषांपेक्षा वेगळी असू शकतात पण कुटुंबात किंवा समाजात पुरुषांच्या मताला अधिक मान्यता दिली जाते. स्त्रियांच्या दृष्टिकोणातून ही वास्तवता एकदा समजावून घेतल्यावर स्त्रियांसंबंधीच्या आकलनात, अभ्यासात फरक पडू शकतो. वेगवेगळ्या विषयांच्या अभ्यासातून स्त्रीविषयक जे पुरावे व ज्ञान उपलब्ध होते ते एकत्रित करून त्याचे संघटन व विश्लेषण होण्यासाठी स्वतंत्र स्त्रीअभ्यासाची आवश्यकता आहे.

## इतिहासाच्या परिप्रेक्षातून स्त्रीअभ्यास

इतिहासविषयक अभ्यासात स्त्रीवादी दृष्टिकोण येईपर्यंत स्त्रियांचा अभ्यास झाला आहे, पण तो पूर्णपणे पुरुषी दृष्टिकोणातूनच झाला आहे. भारतीय इतिहासात प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक कालखंडातील स्त्रियांच्या लेखनाचे संशोधन सुरू झाले आहे. उदा. कल्हणाच्या 'राजतरंगिणी'मधील स्त्रीविषयक दृष्टिकोण, ताराबाई शिंदे यांचे 'स्त्री-पुरुष तुलना', संत कवयित्रीचे लिखाण, लक्ष्मीबाई टिळक यांचे आत्मचरित्र, वेगवेगळ्या प्रांतांतील स्त्रियांचा स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग, धार्मिक इतिहास, तत्त्वज्ञान, साहित्य यामध्ये झालेले लिखाणही पूर्वग्रह दूषित व पुरुषकेंद्रित असू शकते. स्त्री शरीर म्हणजे प्रलोभन, पुरुषांच्या मोक्षमार्गातील धोंड या दृष्टिकोणातून बरेच लिखाण मिळते. मौखिक इतिहासातही म्हणजेच म्हणी, वाक्प्रचार, लोकगीते यातूनही स्त्री कर्तृत्वाचा दर्जा कमीच राहतो. उदा. "नाव सोनुबाई, हाती कथलाचा वाळा", "बायकांची अक्कल गुडघ्यातच", बायको गेली (पळून) तर 'पाठीवरचा

गोंडा गेला', बहिण गेली तर 'नाकाचा शेंडा गेला' अशा अनेक म्हणी स्त्रियांना कमी दर्जा देणाऱ्या आहेत.

इतिहासलेखनात अनेक युद्धांची वर्णने मिळतात. त्यामध्ये स्त्रियांचा उल्लेख 'राणी, दासी' इतपतच राहतो. पुरुषाबरोबर वेगवेगळ्या उल्लेखांची गरज मानली जात नाही. दशरथाकडून कैकयीने तीन वर मागितल्याने रामायण घडले हा उल्लेख वारंवार होतो. पण कैकयीने स्वकर्तृत्वाने रथ उभा ठेवला व युद्ध जिंकण्यास मदत केली म्हणून दशरथाने युद्ध जिंकले व तिला वर दिले याचा उल्लेख बऱ्याचदा हेतुपुरस्सरपणे टाळला जातो. 'ज्ञाननिर्मिती' ही पुरुषच करतात. कारण मनुस्मृतिकाराने हा अधिकार स्त्री व शूद्रांना दिलाच नव्हता. शिकणे, शिकवणे या सर्व पुरुषी मक्तेदारीच्या गोष्टी मानल्या गेल्या. म्हणून मध्ययुगीन काळात सामान्य स्त्रिया यापासून वंचित राहिल्या. ब्रिटिशांच्या आगमनानंतर पाश्चात्य विचारसरणीच्या प्रभावाने यात बदल घडून आला. याचा अभ्यास होणे गरजेचे बनते.

स्त्रीअभ्यासक प्रामुख्याने स्त्रियाच असतात. आजही हेतुपुरस्सरपणे पुरुष अभ्यासक हा स्त्रियांचा प्रांत मानतात. पण १९ व्या शतकातील स्त्री सुधारणांची सुरुवात व लिखाण पुरुष समाजसुधारकांनीच केली आहे. विद्यापीठांची स्वतंत्र स्त्रीअभ्यास केंद्रे, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, स्वतंत्र संघटना व अनेक व्यक्ती स्त्रीअभ्यास करत आहेत. इतिहासातील स्त्रियांच्या वास्तविक स्थितीवर पुराव्यांच्या साहाय्याने प्रकाश टाकण्यासाठी जेव्हा संशोधकात संवेदनशील कुतूहल जागृत होईल तेव्हा तो कालखंड इतिहासात महत्त्वाचा ठरेल. कारण सर्वच स्त्रीअभ्यासक स्त्रीवादी असतात असे नाही. स्त्रीवादाचे अनेक पैलू आहेत. उदारमतवादी, जहालवादी, मार्क्सवादी, समाजवादी, उत्तर आधुनिकतावादी इत्यादी सिद्धांतांमुळे स्त्री समस्यांची कारणे समजावून घेण्यास मदत होते.

## स्त्रीवादी सिद्धांत व व्यवहार

पाश्चिमात्य स्त्रीवादी सिद्धांत जसेच्या तसे भारतीय स्त्रीविषयक समस्यांना लावणे अवघड ठरते. कारण तत्कालीन समाजजीवन इतिहासाच्या अभ्यासाखेरीज पुढे येत नाही. समस्येचे निराकरण, विश्लेषण या गोष्टी परस्परपूरक आहेत. काही वेळा सिद्धांताला गौण रूप येऊन निराकरणाला महत्त्व दिले जाते. उदा. हुंडापद्धतीचा सैद्धांतिक अभ्यास करीत राहण्यापेक्षा ती रूढी नष्ट करण्याची आवश्यकता अधिक असते. त्यासाठी कायदा व्हावा व त्याची अंमलबजावणी व्हावी यासाठी चळवळ करावी लागते. बलात्काराची आकडेवारी गोळा करून काही मते मांडण्यापेक्षा बलात्कार होऊच नयेत म्हणून कुटुंब, अर्थव्यवस्था, शिक्षण व्यवस्था या माध्यमातून पुरुषांच्या मानसिकतेत बदल घडविणे गरजेचे ठरते.

स्त्रीअभ्यासातील सिद्धांत व व्यवहार यात विरोधाभास नाही तर आंतरसंबंध आहेत. हुंडा या समस्येचा शोध प्राचीन भारतीय संस्कृतीतही पुराव्याने मिळतो. कन्यादानाबरोबर 'गोदान' करण्याची प्रथा होती. 'स्त्रीधन' माहेरातून दिले जाते असे आजही हुंडाबळी समस्येची कारणे शोधताना मुलींच्या वडिलांच्या व नवऱ्याच्या संपत्तीवरील हक्क सुरक्षित नाही तर तिला लग्नाला का भाग पाडले जाते ? छळ होत असताना तिला सासरी राहण्यास सक्ती का केली जाते ? ह्या रूढींची, चालीरीतींची, प्रथांची कारणे इतिहासात मिळू शकतात. ही कारणे शोधल्याखेरीज 'हुंडाबळी' समस्या लक्षात येणे सहज शक्य नाही. 'हुंडाबळी' कायदा करून हा प्रश्न सुटेल असे वाटत होते पण तसे झाले नाही. कारण ही समस्या एकेरी नाही तर या रूढींची पाळेमुळे कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक मूल्यांमध्ये तसेच इतर अनेक कारणांत गुंतलेली असतात.

## इतिहास विषयातील स्त्रीअभ्यासाची फलश्रुती

स्त्रियांच्या दृष्टिकोणातून केलेल्या अभ्यासामुळे स्त्रियांची स्थिती, समस्या व त्याबद्दलची सजगता निर्माण होणे शक्य होते. प्राचीन काळी उच्चवर्णीय स्त्रियांना मर्यादित का होईना मिळणारे, यज्ञयाग करण्याचे स्वातंत्र्य मध्ययुगीन काळात का डावलले गेले याची मीमांसा संदर्भ साधनांच्या उपलब्धतेमुळे करणे शक्य होते. यावरून इतिहास विषयातील स्त्रीअभ्यासामुळे खालील गोष्टी अभ्यासणे शक्य होईल.

१. स्त्रियांचे प्रमाण दरहजारी घटत आहे याची जाणीव जनगणनेचा अहवाल पाहिले असता लक्षात येते. मुलींची लग्ने करणे आर्थिक दृष्टीने अवघड असल्याने भ्रूणहत्येविषयी मतपरिवर्तन व मुलींच्या लग्नासाठी मदत करून ही रूढी बंद करण्याचा प्रयत्न लॉर्ड विल्यम बेंटिंकने केला होता. आज ही प्रथा बंद करण्यासाठी गर्भजल परीक्षणावर बंदी वगैरे कायदे करणे शक्य झाले. त्यामुळे मुलींनाही मुलांप्रमाणे समानतेने वागवू असे म्हणण्यापर्यंत समाजात मानसिकता तयार होणे शक्य झाले आहे.

२. कामगार स्त्रियांची आंदोलने यामुळे वेतन अनिश्चिती, वेतन असमानता, कामाचे तास, निकृष्ट जीवनमान कामाच्या ठिकाणचा हिंसाचार याविषयी नवनवीन माहिती प्रकाशात येऊ लागली आहे.

३. स्त्रियांचे शिक्षण, प्रशिक्षण, तंत्रशिक्षण, कमी शिक्षण, दर्जा, भेदभाव, आरोग्य, कुटुंबातील अन्याय, संघर्ष, समाजजीवन याविषयी अनेक प्रश्न समोर येऊ लागले आहेत. प्रत्येक राज्यातील वेगवेगळ्या स्तरांतील अभ्यासामुळे तुलनात्मक अनुमाने काढणे शक्य झाले आहे. उदा. बिहारमधील स्त्रियांपेक्षा महाराष्ट्रातील स्त्रियांची स्थिती बरी आहे.

४. आदिवासी समाजामध्ये मातृसत्ताक कुटुंबपद्धतीचे प्राबल्य असल्याने त्यांच्यावर बंधने कमी आहेत.

५. पूर्वी कुटुंबात व समाजात स्त्रियांवर अत्याचार होतात हेच मान्य केले जात नव्हते. पण आता ही मानण्याची मानसिकता पोलीस, राजकारणी, सामाजिक नेतृत्व, कुटुंबप्रमुख यांच्यात आली आहे.

या अभ्यासातून नुसती आकडेवारी व सिद्धांतच मांडले जात नाहीत तर जुन्या सिद्धांतातील त्रुटी शोधून त्यातील दोष स्पष्ट केले जातात. जर कुटुंबातील स्त्रियांनी शेतातील व घरातील काम विनामोबदला करणे नाकारले तर इतरांकडून जादा पैसे देऊन ती करवून घ्यावी लागतात. स्त्रिया काम करतात पण तुलनेने त्या आहार कमी घेतात. त्यामुळे कुपोषण होते व पुढील पिढी निरोगी निर्माण होणे अशक्य होते. याची आकडेवारी विकास योजना व त्यांचे निष्कर्ष यातून पुढे आली. त्यामुळे इतिहासातील स्त्रियांकडे मानव वंशनिर्मितीतील एक घटक या दृष्टिकोणातून पाहणे शक्य होईल.

इतिहास काळातील प्रत्यक्ष साधनांचा अपुरेपणा जाणवत असला तरी लोक-परंपरेतून आलेले साहित्य, म्हणी, वाक्प्रचार, डायऱ्या, आठवणी, आत्मकथा, न अभ्यासलेली साधने यांच्या साहाय्याने स्त्रियांच्या स्थितीबद्दल, संघर्षाबद्दल माहिती मिळविण्याचे काम इतिहास-संशोधक करीत आहेत. स्त्रीअभ्यासामध्ये सिद्धांत हे स्त्रियांना दिल्या जाणाऱ्या दुय्यम दर्जाचे विश्लेषण करतात. या सिद्धांताच्या साहाय्याने इतिहास, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र अशा अनेक विषयांतील परंपरागत सिद्धांताची सत्यासत्यता तपासली जात आहे. पाठ्यपुस्तकातील स्त्रीविषयक चुकांचे संदर्भ काढून टाकले जात आहेत. उदा. आई स्वयंपाक करते, ताई पाटपाणी घेते, बाबा व दादा जेवतात.

पुरुषवर्गात, नोकरशाहीत, समाजातील विविध स्तरांमध्ये स्त्रियांबद्दलची संवेदनशीलता जागृत करण्याचे प्रयत्न होत आहेत. कायद्यात बदल केले जात आहेत व कायद्याची अंमलबजावणी होण्यासाठी स्वतः स्त्रीला शेवटच्या थरापर्यंत चळवळींच्या माध्यमातून जागृत केले जात आहे. आज स्त्रिया स्वतंत्रपणे एकत्र येऊन संघर्षाचे प्रयत्न करून स्वतःचे आधार व सामर्थ्य मिळवू लागल्या आहेत. म्हणूनच सोप्या शब्दांत सांगावयाचे झाले तर स्त्रीअभ्यासाचा खरा अर्थ म्हणजे भूतकाळातील इतिहासाची पुनर्बांधणी (Reconstruction of Past History) म्हणजेच (Rewriting of past on the basis of feminist perspective. It is an unending dialogue between past & present for future generation.) जुन्या लिहिलेल्या इतिहासाचे पुनरावलोकन व पुनर्लेखन तसेच स्त्रीवादी दृष्टिकोणातून हा भूतकाळाशी पुढील पिढ्यांसाठी कधीही न संपणारा संवाद आहे असेच मानावे लागेल.

# स्त्रीवाद : संकल्पना व सिद्धांत

'Feminism' (फेमिनिझम) हा मूळ शब्द लॅटिन भाषेतील आहे. Femina या शब्दाचा अर्थ Woman असा आहे. 'Having a quality of Females' अर्थात, स्त्रियांचे गुण. १८९० च्या दशकात Womanism च्या ऐवजी Feminism हा शब्द पहिल्यांदा वापरला गेला. Woman हा इंग्रजी शब्द Wifman या शब्दापासून बनला आहे. याचा अर्थ 'स्त्री व्यक्ती' असा आहे. Womanism हा शब्द 'Theory of sexual equality & the movement for women's right' म्हणजेच- 'लैंगिक समानतेचा सिद्धांत आणि स्त्रियांच्या हक्काची चळवळ' या अर्थाने वापरला जाऊ लागला. एलिस रॉसी (Alice Rossi) हिने २७ एप्रिल, १८९५ ला 'The Athenaeum' या नियतकालिकात ग्रंथपरीक्षण लिहिताना प्रथम हा शब्द वापरला व नंतर तो सगळीकडे प्रसारित झाला. इतरांनी वैयक्तिक व्याख्या मांडल्या. पण 'लिंगभेद न मानता स्त्री-पुरुष समानतेवर विश्वास ठेवणारा' अशा अर्थाने हा शब्द वापरला जाऊ लागला.

स्त्रीवाद ही चळवळ असावी. ती तात्त्विक किंवा बोलण्यापुरती न ठेवता प्रत्यक्ष कृतीत आणावी. पुरुषांपेक्षा स्त्रियांना गौणत्व का आणि कसे आले याचे विश्लेषण, स्पष्टीकरण व त्याचबरोबर हे असंतुलन कसे कमी करावे यावर स्त्रीवाद प्रकाश टाकतो. तसेच स्त्रियांच्या दुय्यमत्वाचे विश्लेषण करणारी एक राजकीय विचारसरणी असे स्त्रीवादाचे स्वरूप नसून स्त्रियांना त्यांचे खरे श्रेय मिळावे म्हणून संघर्ष करणारी ही एक प्रकारची बांधीलकी असते.

स्त्रियांना त्यांच्या बाईपणामुळे (Womanism) दुय्यमत्व मिळते व अन्याय सहन करावा लागतो. स्त्रीचे हे दुय्यमत्व व्यवस्थात्मक म्हणजेच कुटुंब व समाज-व्यवस्थेत याचे मूळ आहे. यावरच सर्व स्त्रीवाद्यांच्या विचारांची वाटचाल चालू आहे.

**'जॅकी स्टेसी'** (Jackie Stacey) यांनी **'इन्ट्रोड्युसिंग वुमेन स्टडीज'** (मॅकमिलन प्रेस लंडन, १९९३) मध्ये **'अनटॅगलिंग फेमिनिस्ट थेअरी'** नावाचा लेख लिहिला. त्यामध्ये त्या म्हणतात, ''विशेष अनुभवांचे विश्लेषण करून स्त्रियांचे दुय्यमत्व समजावून घेऊन ते बदलण्याची दिशा दाखविणारे, लिंगभेदातून निर्माण होणाऱ्या विषमतेला छेद देऊन त्याला राजकीयदृष्ट्या संक्रमित करण्यासाठी कोणती व्यूहरचना असावी याविषयी मार्ग सुचविणे, जीवनाच्या सर्व क्षेत्रांत होणारे स्त्रियांचे शोषण आणि दुय्यमत्व नष्ट करणे यासाठी प्रयत्न करणे म्हणजे स्त्रीवाद होय. ही एक विद्याशाखा आहे.''

'न्यू एनसायक्लोपीडिया ऑफ ब्रिटानिका' *(New Encyclopaedia of Britanica)* मध्ये स्त्री चळवळीची व्याख्या पुढीलप्रमाणे आहे - ''अनेक छटा असणाऱ्या बहुविध संघटना, व्यक्ती, कल्पना यामधून व्यक्त होणाऱ्या स्त्रियांच्या बदलत्या भूमिकांशी निगडित असणारी सामाजिक चळवळ. यामध्ये मवाळ सुधारणावादी दृष्टिकोणापासून समाजात सर्वांगीण बदलापर्यंत विविध भूमिका असणाऱ्यांचा समावेश होतो. या सर्वांमध्ये दिसणारा एक समान दृष्टिकोण म्हणजे स्वतःची जीवनपद्धती आणि व्यवसाय निवडण्यामध्ये स्त्रियांना पूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे.''

**Ruth Brandwin** - "Feminism is a perspective, a thought structure, a value belief system that is an alternative way of viewing the world."

याचा अर्थ, वैचारिक रचना व मूल्याधारित विश्वासाची पद्धती असणारा जगाकडे पाहण्याचा पर्यायी दृष्टिकोण म्हणजे स्त्रीवाद होय.'' आजपर्यंतचा सर्व इतिहास पुरुषांना केंद्रबिंदू मानून लिहिला गेला व तो पुरुषांनीच लिहिला तेव्हा स्त्रियांना केंद्रस्थानी ठेवून इतिहासाचे पुनर्लिखाण करणे हा एक स्त्रीवादी लेखनाचा नवीन व पर्यायी दृष्टिकोण आहे.

इतिहासकार **लिंडा गॉर्डन** (Linda Gordon) यांच्या मते, ''स्त्रियांचे दुय्यमत्व आणि त्यासाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षाचे विश्लेषण म्हणजे स्त्रीवाद होय.''

**हेस्टर आईनस्टाईनच्या** (Hester Eienstein) मते, ''स्त्रीवाद तीन विचारधारांवर आधारित आहे. एक मानवाचे हक्क, दोन समाजवादी सिद्धांत आणि तिसरा लिंगभेदविषयक अभ्यास.''

**बॉटमूर आणि इतर (संपा.) 'डिक्शनरी ऑफ मार्क्ससिस्ट थॉट'** (बुकवेल पब्लिशर्स, ऑक्सफर्ड १९८३) मध्ये स्त्रीवादाचा अर्थ व महत्त्व पुढीलप्रमाणे दिले आहे.

''स्त्रीवाद हा वादग्रस्त विषय आहे. क्रांतिकारी मार्क्सवाद आणि उदारमतवाद यामुळे स्त्रीवाद हा स्त्री-पुरुष समानतेचा विषय आहे. असा युक्तिवाद एका बाजूने करता येतो तर दुसऱ्या बाजूने स्त्रियांचे शोषण आणि पिळवणूक यांचा नाश केल्याखेरीज मानवी मुक्ती शक्य नाही.'' परंतु हे सर्व फक्त समाजवादी क्रांतीतूनच प्रस्थापित होऊ शकेल असा विचारही मांडला जातो.

ग्रेट ब्रिटन आणि अमेरिकेमध्ये लोकशाहीवादी, उदारमतवादी, स्त्रीवादाची फार मोठी परंपरा आहे. त्या स्त्रीवाद्यांचे लक्ष समान आणि अधिकाधिक हक्क मिळविण्याकडे असते. जाणीव जागृती ही स्त्रीवादाची मध्यवर्ती रणनीती आहे. स्त्रीवाद हा एक सलग सिद्धांत नसून अनेक सिद्धांतांमध्ये त्याचा समावेश होतो.

**विल्सन** (Wilson) यांच्या मते, ही केवळ स्त्रियांचे दुय्यमत्व नष्ट करण्यासाठी आलेली जागृती नसून त्यांच्या खऱ्याखुऱ्या श्रेयापर्यंत जाण्याचा मार्ग सुकर करणारी राजकीय बांधीलकी आहे.

**इमेल्डा व्हेलहन (Imelda Velwan)** (१९९५) यांच्या मते, स्त्रियांना त्यांच्या बाईपणामुळे अन्याय सहन करावा लागतो. या गृहीतावर आधारित आपली भूमिका निश्चित केली आहे. स्त्रीवाद हा अनेक पातळ्यांवरील असणारा ज्ञानसमुच्चय आहे आणि जीवनाच्या सर्व क्षेत्रांतील स्त्रियांसंबंधीची विषमता आणि शोषण नष्ट करणे हा स्त्रीवादाचा उद्देश आहे.

## स्त्री-मुक्तिवाद

अमेरिका, जपान व युरोपमधील अनेक देशांमध्ये १९६० नंतर आधुनिक काळातील स्त्री-प्रश्नासंबंधी चर्चा व चळवळ सुरू झाली. या विचारांना स्त्री-मुक्तिवादी विचार असे मानले जाऊ लागले. प्रारंभी युरोपमधील नवडाव्या विचारापासून बाजूला झालेल्या जहाल राजकीय विचारांच्या स्त्रियांना 'स्त्रीवादी' म्हटले गेले. पण पुढे हे नाव स्त्रीमुक्ती चळवळीच्या संदर्भात वापरले गेले. स्त्रियांना पुरुषांप्रमाणेच व्यक्तिस्वातंत्र्य, स्वतःचे आयुष्य स्वायत्तपणे घडविण्याचा अधिकार आहे. या मूळ सूत्रावर सर्वच स्त्रीवाद्यांचा भर आहे.

हा विचार समाजातील सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक संरचनांना आव्हान देतो. स्त्री-पुरुषातील लिंगाधिष्ठित साचेबंदपणा, पुरुषांच्या स्त्रीविषयक प्रतिमा, स्त्रियांना समाजात मिळणारे स्थान व भूमिका, पुरुषसत्ताक कुटुंबव्यवस्था इत्यादी अनेक मुद्द्यांना या विचाराने हात घातला.

### स्त्री-मुक्ती विचारांचे केंद्रीकरण

स्त्री-मुक्ती विचारांचे केंद्रीकरण हे चार महत्त्वाच्या प्रश्नांभोवती होते.

१. उत्पादन व्यवस्थेतील स्त्रियांचे कार्य

२. पुनरुत्पादन (मानववंश व श्रमशक्तीचे पुनरुत्पादन)

३. स्त्री-पुरुष भेद घडविणारी सामाजिक संस्कार प्रक्रिया

४. लैंगिकता व स्त्रियांचे प्रश्न (विवाह, बलात्कार, लैंगिक शोषण).

१९७५ नंतर भारतात स्त्रीवादी चळवळ सुरू झाली. त्यास 'नवीन सामाजिक चळवळ' असे नाव मिळाले. ह्या चळवळीबद्दल अनेक समज-गैरसमज निर्माण झाले. परंतु एवढे मात्र निश्चित की, 'या चळवळीने स्त्री-पुरुष विषमतेचा प्रश्न धसास लावला. पण त्यामुळे नवी स्त्रीवादी भारतीय चळवळ पाश्चात्त्यांचे अनुकरण करणारी, व्यक्तिवादी विचारांना प्राधान्य देणारी तसेच विवाह व कुटुंबसंस्था यांना

उद्ध्वस्त करणारी आहे' असेही आरोप या चळवळीवर केले गेले. परंतु प्रत्यक्षात या चळवळीने स्त्रियांवरील अत्याचाराचे भीषण वास्तव उघडे केले. विवाहाअंतर्गत असणारी विषमता, कुटुंबा-कुटुंबामधील विविध पातळींवरील हिंसा तसेच शासन-व्यवस्था व पुरुषप्रधान व्यवस्था, त्यांचे हितसंबंध या सर्वांवर परखड टीका ह्या चळवळीने केल्यामुळे स्त्रियांच्या इतिहासातील सत्ताहीनतेच्या प्रश्नाला गती मिळाली "Women have been deprived of their basic rights in historical writings." ऐतिहासिक लिखाणात स्त्रियांना त्यांच्या मूलभूत हक्कांपासून बाजूला ठेवले गेले आहे हे मान्य करणे भाग पडले.

स्त्रीवादी चळवळ एकसंध, एकाच चेहऱ्या-मोहऱ्याची नाही. अनेक स्तरांवरील नेतृत्व, अनेक भूमिका या चळवळीतून अभिव्यक्त झाल्या. सर्वांना आपलेसे करणारी एक मध्यवर्ती कल्पना किंवा सूर अजूनही या चळवळीत सापडलेला नाही; हे मान्य करूनही आधुनिकतेच्या प्रक्रियेत घुसळून निघणाऱ्या भारतीय जीवनावर स्त्रियांच्या चिकित्सक विचारांचा प्रभाव निर्माण होत आहे, यात मात्र संदेह नाही.

आजपर्यंतच्या भारतीय इतिहासलेखनातील स्त्री-प्रतिमा नवीन परिप्रेक्षात गेल्याने तसेच स्त्रियांवरील संदर्भ साधनांच्या साहाय्याने केलेल्या अभ्यासामुळे अनेक प्रश्नांवर गांभीर्याने विचार करता येण्यासारखा आहे. पण स्त्रीवादी अभ्यासकांचे बरेचसे लेखन इंग्रजीत उपलब्ध आहे. त्यामुळे आजही अनेक सामान्य वाचकांपासून ते दूर आहे.

## स्त्रीवादी सिद्धांतांचा आढावा

स्त्रीवादी विचार हा नेहमी अस्तित्वात होताच. परंतु स्त्रीवादाचे सैद्धांतिकीकरण हे सत्तरच्या दशकाचे अपत्य आहे. स्त्रीवादी सिद्धांताचा साधारण अर्थ असा की, स्त्रियांच्या दुय्यमत्वाचे चिकित्सक स्पष्टीकरण देणारी ज्ञानशाखा. उदारमतवादी, जहालमतवादी, मार्क्सवादी आणि समाजवादी, उत्तर आधुनिकतावादी हे स्त्रीवादी सिद्धांताचे सर्वसामान्य वर्गीकरण केले जाते. पण हे हवाबंद कप्पे नव्हेत. **झिलाह आईन्स्टाईन** (Zillah Eizenstein) यांनी सांगितल्याप्रमाणे सर्व स्त्रीवादी दृष्टिकोणांचा विकास हा उदारमतवादी विचारधारातूनच झाला आहे. प्रामुख्याने स्त्रीवाद -

**१. मानवाचे हक्क** : नागरिक म्हणून सार्वजनिक जीवनात सहभागी होण्याचा हक्क, मतदानाचा हक्क तसेच राजकीय पद व संपत्ती धारण करण्याचा हक्क.

**२. समाजवादी सिद्धांत** : आर्थिक समानतेखेरीज राजकीय उदारमतवाद निष्फळ व पोकळ आहे. मार्क्सच्या मताप्रमाणे, उत्पादनाच्या साधनावर पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांचा मालकी हक्क असणे म्हणजेच सामाजिक न्याय व समानता.

**३. लिंगभेद दृष्टिकोणाचा अभ्यास** : २० व्या शतकाच्या सुरुवातीला **फ्राईड**

(Friyed), **विल्यम राईस** (William Rice), **मागरिट** (Margaret), **हर्बर्ट मार्क्सूझे** (Herbert Masesooze) यांनी प्रथम लिंगभेद संबंधांचा (Gender Relationship) अभ्यास केला.

वरील तीन प्रवाहांमुळे आजवरच्या इतिहासातील स्त्रियांच्या स्थानाकडे राजकीय, आर्थिक आणि लिंगभेद स्वातंत्र्य या दृष्टिकोणातून आपण पाहू शकतो. स्त्रियांचे दुय्यमत्व आणि लिंगभेद दृष्टिकोण यांना शह देण्यासाठी राजकीय परिवर्तन करण्याच्या दिशेने स्त्रीवादी सिद्धांत महत्त्वाची भूमिका बजावतात.

## उदारमतवादी स्त्रीवाद (Liberal Feminism)

उदारमतवाद्यांच्या मते, भौतिक बाबींपेक्षा हक्कांना अग्रक्रम दिला पाहिजे. म्हणजेच व्यक्तिगत हक्कांचे समर्थन एवढ्यासाठीच केले जाते की, या हक्कांमुळे आपण इतरांना त्यांच्या भौतिक बाबींपासून वंचित न करता स्वतःच्या भौतिक बाबी निवडू शकतो. १८ व्या व १९ व्या शतकातील उदारमतवादी स्त्रीवाद्यांनी मुख्यतः स्त्रियांना शिक्षण आणि समान संधी हे मुद्दे हाताळले.

**१. मेरी वुल्स्टोन क्राफ्ट** (Mary Wolstone Craft) : या फ्रेंच स्त्रीला स्त्री-मुक्ती चळवळीची आद्यप्रवर्तक मानले जाते. वयाच्या तिसाव्या वर्षी १७९२ मध्ये स्त्रीहक्काची संकल्पना "The Vendication of Rights For Women" म्हणजेच 'स्त्रियांच्या हक्कांचे समर्थन' हे पुस्तक लिहून तिने मांडली. फ्रेंच राज्यक्रांतीने स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या घोषणा गाजवून 'हक्क' हा शब्द सर्वमान्य केला. पण हे हक्क पुरुषांबद्दल होते. मेरीने जेव्हा अबलांच्या हक्कांची घोषणा केली तेव्हा समाजाला मोठा धक्का बसला. ती स्वतःच बंडखोर वृत्तीची होती. या पुस्तकात तिने संपन्नतेचा **बुझ्र्वा** (मध्यमवर्गीय) स्त्रियांवर होणारा नकारात्मक परिणाम विशद केला.

मेरी वुल्स्टोन क्राफ्टच्या मते, पतीच्या आर्थिक सुबत्तेमुळे मिळणारी सुखे साध्य करण्यासाठी स्त्रियांनी स्वतःचे स्वातंत्र्य, आरोग्य, नीतिमत्ता सोडून दिली आहे. हे स्त्रियांच्या लक्षात येत नाही. स्त्री ही मानव असून इतरांप्रमाणे स्वतःचा विकास करून घेण्याचा तिला हक्क आहे. शिक्षण, राजकारण, अर्थकारण, समाजकारण, विवाहसंस्था अशा सर्व गोष्टी आणि क्षेत्रांत तिला समान हक्क असले पाहिजेत. स्त्रियांनी यात सुधारणा करावी यासाठी तिने काही प्रस्तावही मांडले.

रूसोच्या 'Philosophy of Education' (शिक्षणाचे तत्त्वज्ञान) या ग्रंथावर टीका करताना मेरी वुलस्टोन क्राफ्ट म्हणते, रूसोने कला, शृंगार आणि काव्य यांचे शिक्षण स्त्रियांची प्रतिनिधी सोफिया हिच्यासाठी तर विवेकाधिष्ठित शिक्षण हे हिरो एमिल याच्यासाठी असा भेदभाव केला आहे. तिच्या मते, ''सहशिक्षण आणि पुरुषांच्या बरोबरीची वागणूक मिळविणे म्हणजेच स्त्रीला व्यक्तिमत्त्व मिळणे होय.''

मेरी वुल्स्टोन क्राफ्टने मांडलेली स्त्री-हक्कांची संकल्पना त्या काळी सर्वस्वी नवीन होती. मेरी वुल्स्टोन क्राफ्ट हिने पेरलेले स्त्रीवादी विचार आज जगभर पसरले आहेत. त्यामुळेच तिला या चळवळीची आद्यप्रवर्तक मानले जाते.

**२. जॉन स्टुअर्ट मिल** (John Stuart Mill) **(१८०६ ते १८७३)** : हा इंग्रज तत्त्वज्ञ, अर्थतज्ज्ञ, राजकारणपटू होता. स्त्रीवाद्यांच्या इतिहासात स्त्रियांच्या हक्कांविषयी 'The Subjection of Women (1869) 'स्त्रियांची पराधीनता' हे पुस्तक त्याने लिहिले. तो फक्त लिहूनच थांबला नाही तर पार्लमेंटमध्ये निवडणुकीसाठी स्त्रियांना बरोबरीचे प्रतिनिधित्व मिळावे या मुद्द्यावर निवडणूक कार्यक्रम (अजेंडा) मांडला. १८६५-६८ या काळात तो वेस्ट मिनिस्टर या भागातून लिबरल पार्टी लीडर म्हणून निवडला गेला. १८६७ मध्ये प्रथमच त्याने पार्लमेंटमध्ये टॅक्स भरणाऱ्या स्त्रियांना मतदानापासून वंचित ठेवता येणार नाही हा मुद्दा मांडला. पण ७३ विरुद्ध १९६ मतांनी ही सूचना फेटाळली गेली. त्यामुळे तो स्त्रियांना पार्लमेंटमध्ये समान प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे असे मानणारा पहिला इंग्रज ठरला. त्यामुळे स्त्रीवादाच्या १९ व्या शतकातील पहिल्या लाटेला वैचारिक पाठबळ मिळाले.

१८३२ मध्ये जॉन स्टुअर्ट मिल व हॅरिअट टेलर मिल (Harriet Taylor Mill) यांनी 'अर्ली एसेज ऑन मॅरेज अॅन्ड डिव्होर्स' 'विवाह आणि घटस्फोट यासंबंधीचे निबंध' ही लेखमाला प्रसिद्ध केली. त्यात असे म्हटले आहे की, ''रूढींमुळे स्त्रिया घरात बंदिस्त आहेत. त्यांच्या मते, स्त्रियांना समान शिक्षण, आर्थिक, वैधानिक आणि प्रशासकीय बाबतीत समान सहभाग मिळाला तर स्त्रियाही पुरुषांप्रमाणेच विवेकनिष्ठ आणि सक्षम होतील.'' त्यामुळे स्वतःचे कुटुंब सुधारण्यासाठी त्या सक्षम बनतील.

**३. सिमॉ दि बु** (Simone de Beauvoiv) : "The Second Sex" म्हणजेच 'दुय्यम लैंगिकता' हा ग्रंथ सिमॉ दि बु यांनी १९४९ मध्ये लिहिला. पण त्या पुस्तकाचा खरा प्रभाव १९६० नंतर पडला. कारण १९६० ते १९८० या कालखंडात आधुनिक स्त्रीवादी विचारप्रवाह मांडले गेले. या ग्रंथाचे पुनर्प्रकाशन १९८९ मध्ये झाले. यामध्ये स्त्रियांच्या दुय्यमत्वाची कारणे आणि त्यासाठी केले जाणारे प्रयत्न यांचे विश्लेषण आहे. त्यांच्या मते, पुरुषांची सेवा करताना स्त्रिया एक वस्तू बनल्या. पुरुषांनी स्वतः 'स्व' व स्त्रियांना 'इतर' घोषित केले. स्वतः मुक्त राहण्यासाठी इतरांवर दुय्यमत्व लादले. ज्याप्रमाणे गोऱ्यांनी काळ्यांना 'इतर' बनवले व दडपले तसेच श्रीमंतांनी गरिबांवर जुलूम जबरदस्ती केली. त्यांच्या मते, स्त्रियांची दडपणूक दोन कारणांमुळे वैशिष्ट्यपूर्ण आहे.

१. पुरुषांपेक्षा स्त्री ही कायमच दुय्यम आहे ही ऐतिहासिक वस्तुस्थिती केवळ योगायोग नाही पण तसे मानले जाते.

२. स्त्रियांची अशी मानसिक धारणा केली गेली की, पुरुष हे आवश्यक व स्त्रिया अनावश्यक असतात. म्हणून स्त्रिया आपल्या दुय्यमत्वाचे आंतरीकरण म्हणजेच समर्थन करू लागतात.

बु यांच्या मते, स्त्रियांच्या पत्नी व माता या भूमिकांमुळे स्वविकास खुंटतो. यामुळेच स्त्रियांचे वस्तूत रूपांतर झाले. स्त्री म्हणजे स्वयंपाक करणारी, त्याग करणारी, स्वच्छता ठेवणारी यंत्रे बनली. यातून स्वतःची सुटका करावी म्हणून त्यांनी तीन मुद्दे मांडले.

१. स्त्रियांनी कामासाठी घरातून बाहेर पडले पाहिजे.

२. स्त्रियांनी विचारक्षेत्रात आले पाहिजे.

३. स्त्रियांनी समाजवादी संक्रमणामध्ये कार्यरत असले पाहिजे.

बु या अस्तित्ववादी (Ex-istentialist) स्त्रीवादी म्हणून ओळखल्या जातात. त्यांच्या लेखनामुळे 'स्त्रियांच्या दुय्यमत्वाचे सिद्धांतीकरण' पुढच्या टप्प्यात गेले. अमूर्त परिकल्पना आणि देहनिष्ठतेंकडे दुर्लक्ष याबरोबरच वैचारिक तज्ञतेला दिलेल्या महत्त्वामुळे त्यांच्यावर टीका झाली.

२० व्या शतकातील आधुनिक उदारमतवादी स्त्रीवादी लिखाणाच्या लाटेवर १९ व्या शतकातील लेखनाचा परिणाम जाणवतो. बेटी फ्राईडन (Betty Frieden) यांनी 'स्त्रीत्वाचे गूढ' (The Feminine Mistique, 1968) हे पुस्तक लिहिले. त्यांच्यावर १९६० मध्ये स्थापन झालेल्या अमेरिकेतील 'नॅशनल ऑर्गनायझेशन ऑफ वुमेन' (NOW) यांच्या विचारांचा प्रभाव होता. सामाजिक, आर्थिक व वैयक्तिक स्वातंत्र्यप्राप्तीच्या उद्दिष्टांकरिता ही चळवळ उभारली होती. यामधील स्त्रियांना नोकरी, पगार, पदोन्नती संबंधी बौद्धिक क्षमता व अंगभूत गुणांवर आधारित न्याय हवा होता. पुरुषांकडून आत्मसन्मानपूर्वक वागणुकीची माफक अपेक्षा होती.

बेटी फ्राईडनने अमेरिकेतील मोठ्या संख्येने असलेल्या गृहिणींच्या प्रश्नांचे विश्लेषण केले. घरात सर्व सुख-सोई असूनही स्त्रियांना घरात तुरुंगवासाचा प्रत्यय येत होता. म्हणूनच तिने सुचवले की, घराबाहेर येऊन स्त्रियांनी 'सुपरवुमन' बनण्यासाठी काम केले पाहिजे. यासाठी वेळेच्या दृष्टीने लवचीकता असणारी कामे स्त्रियांनी स्वीकारावीत.

१९८० च्या दशकात 'सेकंड सेक्स' हा ग्रंथ लिहिला. त्यात त्या म्हणतात, ''लैंगिकतेच्या राजकारणाने स्त्रिया स्त्रीवादी गुढाच्या बळी ठरल्या आहेत. तेव्हा स्त्रीवादी चळवळीने फक्त करिअरच्या पाठीमागे न लागता प्रेम व संगोपन याकडेही लक्ष द्यावे.'' तसेच त्यांनी स्त्रीवादी चळवळीने पुरुषांच्या हातात हात घालून आपली चळवळ पुढे न्यावी असाही सल्ला दिला. त्यामुळे अमेरिकन सरकारने प्रे. रेगनच्या

नेतृत्वाखाली 'कुटुंबाकडे परत' या प्रचार मोहिमेची सुरुवात केली. या मोहिमेला बेटी फ्राईडनच्या तत्त्वज्ञानाची मदत झाली.

### उदारमतवादी स्त्रीवादावरील टीका

पुरुषी मूल्ये हीच मानवतावादी मूल्ये म्हणून स्वीकारण्याची प्रवृत्ती आणि सामुदायिक सुखांपेक्षा व्यक्तीच्या सुखावर दिलेला अवास्तव भर यामुळेच उदारमतवादी स्त्रीवाद्यांवर बरीच टीका झाली. कारण त्यांनी परंपरागत दृष्ट्या पुरुष हे तत्त्वज्ञ असतात असे मानले. त्यांचा समाजाकडे पाहण्याच्या दृष्टिकोणावर पाश्चात्त्यांचा प्रभाव होता. त्यामुळेच बौद्धिक हे शारीरिकतेपेक्षा अग्रक्रमाचे असते हे सत्य म्हणून त्यांनी स्वीकारले.

उदारमतवादी स्त्रीवादावर टीका करताना **इमेल्डा व्हेलहन (Imelda Velwan)** 'मॉडर्न फेमिनिस्ट थॉट फ्रॉम सेकंड वेव्ह टू पोस्ट फेमिनिझम'मध्ये **ॲलिसन यागर (Alison Yager)** यांचे मत देऊन म्हणतात, ''बौद्धिक बाबींना शारीरिक बाबींपेक्षा अधिक महत्त्व मिळाले.'' त्यातून अनेक प्रश्न निर्माण झाले. यातून अटळरित्या शारीरिक व्यवहाराचे अवमूल्यन तर झालेच पण राजकीय अलिप्ततावाद (Solpsism), पलायनवाद (Skepticism) पुढे आले. स्वतःच्या गरजा आणि हितसंबंध जपणारी प्रत्येक व्यक्ती ही दुसऱ्या व्यक्तीपासून अलग असते. यावर राजकीय अलिप्ततावाद विश्वास ठेवतो. मानवी सुखाचा विचार करणारे राजकीय तत्त्वज्ञानातील मूलभूत प्रश्न आणि हे साध्य करण्यासाठी असणारी साधने त्यांना कोणतेही उत्तर असत नाही असे राजकीय पलायनवाद मानतो. अशा प्रकारची टीका १९९० च्या दशकात उदारमतवादी स्त्रीवाद्यांच्या संकल्पनांवर व दृष्टिकोणावर करण्यात आली.

### मार्क्सवादी स्त्रीवाद (Marxist Feminism)

स्त्रीवादाच्या विविध विचारप्रवाहांत मार्क्सवादी स्त्रीवाद महत्त्वाचा मानला जातो. हा विचार प्रामुख्याने स्त्रियांचे शोषण, दमन, अत्याचार यांवर आपले लक्ष केंद्रित करतो. या विचारप्रवाहातील स्त्रिया परंपरागत मार्क्सवादी मांडणी नाकारत नाहीत तर त्यामध्ये काही भर घालू इच्छितात. भांडवलशाहीच्या उदयाबरोबरच स्त्रीचे अवमूल्यन होत गेले. पुरुषी वर्चस्वाने स्त्रियांचे श्रम स्वस्तात मिळवून वेतन कमीतकमी ठेवणे ही भांडवलशाहीच्या लाभाची गोष्ट साधली. मार्क्सवाद्यांना भांडवली समाजरचनेतील सर्वांचे शोषण नष्ट करावयाचे असल्याने स्त्रीवाद त्याकडे आकर्षित झाला. काही विशिष्ट गटावर भांडवलशाही समाजात होणारी जुलूम, जबरदस्ती आणि शोषण थांबवण्यासाठी स्त्रीवादी व मार्क्सवादी चळवळींनी सामाजिक संस्थांमध्ये पूर्ण बदल करण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळेच स्त्रीवाद्यांनी मार्क्सवादातील 'वर्ग' या संकल्पनेशी आपला संवाद सुरू केला.

**टॉग रोजमेरी** (Togg Rosemary) १९८४, यांच्या मते, ''स्त्रियांचे दुय्यमत्व निश्चित करण्यासाठी मार्क्सवादी स्त्रीवाद्यांनी 'वर्ग' हा अंतिम शब्द मानला. त्यांनी आपल्या विचारांचा प्रधानबिंदू म्हणून श्रमाच्या बाजारपेठेतील कामगार स्त्रियांचे भवितव्य प्रमुख मानले. जहालवादी स्त्रियांप्रमाणेच त्यांनी सांगितले की, पुरुषशाही प्रमुख व्यवस्थेच्या गुलामगिरीत स्त्रिया अडकल्या आहेत. पुरुषशाही व्यवस्था ही भांडवलशाही व्यवस्थेसाठी कार्य करते व त्या व्यवस्थेच्या आधारेच जिवंत राहते. त्यामुळे स्त्रीवर अन्याय होतो.

**१. मार्क्सवादी स्त्रीवादी सिद्धांताच्या विकासात एंगल्स यांच्या लिखाणाचे महत्त्व** : फ्रेड्रिक एंगल्स (Fredrick Engles) यांनी 'द ओरिजिन ऑफ द फॅमिली, प्रायव्हेट प्रॉपर्टी ॲन्ड द स्टेट' हा ग्रंथ लिहिला. त्यामध्ये ते म्हणतात, ''आदिम समाजात (Food Gathering Stage) विवाहविषयक कोणतेच नियम नव्हते. त्या समाजात अनेकांशी लैंगिक संबंध असणे गैर नव्हते. ही समाजरचना 'जेन्स' (House hold) म्हणजेच 'घरादारांची' होती; ज्यात स्त्रिया आपल्या मुलाबाळांसह राहत. अर्थव्यवस्था, 'जेन्स' (Janes) भोवती केंद्रित असल्याने स्त्रिया अर्थव्यवस्थेच्या केंद्रस्थानी होत्या. तेथे मातृसत्ताक पद्धती होती.'' आजची कुटुंबव्यवस्था ही पूर्णपणे भिन्न आहे.

अन्न गोळा करणे (Food Gathering Stage) मधून मानवाने अन्न निर्माण (Food Producing Stage) मध्ये पदार्पण केल्यानंतर त्यांच्या भटकंतीच्या जीवनाला स्थिरता आली. स्त्रियांनी विवाह करणे पसंत केले. त्यानंतर मानव पशुपालन अवस्थेत येऊन पोहोचला तेव्हा अतिरिक्त उत्पादन निर्माण झाले. प्राण्यांच्या विनिमयाने व्यापाराचे स्वरूप धारण केले. त्यामुळेच अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू 'जेन्सच्या' बाहेर सरकला. अतिरिक्त उत्पादन वाढल्याने त्याचा वारस ठरविण्यासाठी एकाच स्त्रीपासून मुले होणे याचे महत्त्व वाढले आणि स्त्रियांनी वंशसातत्य टिकविण्यासाठी एकाच पुरुषाशी विवाह करावा ही पद्धत अस्तित्वात आली.

एंगल्स यांना असे वाटते की, सर्वहार वर्गामध्ये (Classes Society) पुढील वारसांना देण्यासाठी खाजगी मालमत्ताच नसते त्यामुळे स्त्रिया दडपल्या जात नाहीत. हे स्त्रियांच्या दुय्यमत्वाचे केलेले पहिले मार्क्सवादी विश्लेषण मानता येईल.

**२. मार्क्सवाद्यांनी स्त्रियांचे काम, दर्जा आणि वेतन यांसंबंधी मांडलेले विचार**

१. भांडवलशाही कुटुंबव्यवस्थेमध्ये स्त्रियांना घरकामाचा मोबदला मिळत नाही. घरकामाला पूरक असेच काम त्यांना दिले जाते. स्त्रिया कारखान्यातील कामासाठी घराबाहेर पडू लागल्या तरी त्यांची मुक्ती होणार नाही.

२. घरातील कामाची बाजारात विक्री होत नाही. म्हणजे हे श्रम अनुत्पादक असतात असे नाही. जोपर्यंत घरकामाचे सामाजीकरण होत नाही तोपर्यंत स्त्रियांच्या श्रमाच्या बाजारपेठांतील प्रवेश म्हणजे स्त्रीमुक्तीच्या संदर्भात मागे टाकलेले पाऊल होय.

३. त्यामुळेच **डेलाकोस्टा** (Dalla Costa) व **सेल्मा जेम्स** (Selma James) यांनी घरकामाला वेतन मिळावे असे सुचविले आहे.

४. मार्क्सवादी स्त्रीवाद्यांनी पुरुषांच्या कामासाठी त्यांना मिळणारे वेतन व स्त्रियांना त्याच कामासाठी मिळणारे वेतन यातील तफावत दाखवून दिली. वेतनश्रेणी रचना ही कामातील जबाबदारी, उत्तरदायित्व यांच्या आधारे केली जावी त्यासाठी घेतला जाणारा लिंगाधार चुकीचा आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न केला.

५. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत स्त्रियांच्या श्रमाची गरज लागते. अर्थात, त्यामध्ये श्रमिक वर्गातील स्त्रियांच भाग घेतील. परिणामतः भांडवलशाहीत उच्चवर्णीय स्त्रिया घरकाम करतील व त्यामुळे त्यांचा दर्जा तोच राहील. मात्र श्रमिक वर्गातील स्त्रियांना सन्मान व चांगला दर्जा प्राप्त होईल.

स्त्रियांच्या घरकामाला मोल नसते व ते भांडवलशाहीच्या पथ्यावर पडते म्हणून सार्वजनिक उद्योगधंद्यात पुरुषांबरोबर समान पातळीवर स्त्रियांना सहभागी करून घेता आले पाहिजे असा आग्रह मार्क्सवादी स्त्रीवाद करतो. त्यासाठी समतावादी शासनाने बालसंगोपन, वृद्धांची देखभाल व कुटुंबात होणारे इतर उत्पादक काम यांची जबाबदारी उचलली पाहिजे असे त्यांचे मत आहे.

या अभिजात मार्क्सवादापलीकडे जाण्याचा एक प्रयत्न शीला रॉबॉथमने केला. तिच्या मते, भांडवलशाही समाजाचा विकास, त्यांचे कार्य आणि तो कसा बदलता येईल याचा विचार स्त्रीवादाला आवश्यक आहे. परंतु, भांडवली उत्पादक व्यवस्थेतून निर्माण होणारे सामाजिक संबंध केवळ ती उत्पादन व्यवस्था बदलल्याने संपतील असे गृहीत धरणे योग्य नाही. तिच्या मते, समाजपरिवर्तनाच्या चळवळीत स्त्रियांचा खऱ्या अर्थाने सहभाग हवा असेल तर उत्पादनाचा अर्थ व्यापक केला पाहिजे.

वंशसातत्यासाठी पुनरुत्पादनाचे जे काम स्त्रिया करतात त्यासाठी खर्च होणाऱ्या तिच्या शारीरिक श्रमाची दखल घेतली गेली पाहिजे. तिच्या मते, आज मार्क्सवाद आणि स्त्रीवाद यामध्ये ऐक्य निर्माण झाले आहे. कारण स्त्रीवादी चळवळीसमोर स्त्रियांवरील सांस्कृतिक दडपण कमी करून त्यांच्यात जाणीव जागृती झाली पाहिजे. तिच्या मते, समाजवादी क्रांतीचा विचार मांडणाऱ्यांनी स्वायत्त चळवळीतून निर्माण होणारी शक्ती व्यापक संघटनेशी कशी जोडावी याचा विचार नीट केलाच नाही. त्यासाठी नवा सांस्कृतिक आकृतिबंध व राजकारणाकडे पाहण्याचा एक वैयक्तिक दृष्टिकोण स्त्रियांच्या चळवळीने तयार व्हावा असे तिला वाटते.

थोडक्यात, मार्क्सवादी स्त्रीवाद स्त्रियांचे काम, वेतन व त्यांची लिंगभेद आधारित रचना यावर भर देतो. त्यांच्या लिखाणात स्त्रियांचे पुनरुत्पादक, श्रम व होणारा छळ यांना नगण्य स्थान होते. पण हे करत असताना स्त्रियांनी केलेले घरकाम कसे दुर्लक्षित केले जाते व रटाळवाणे काम त्यांना दिले जाते. कुटुंबव्यवस्था भांडवलशाही व्यवस्थेशी कशी निगडित होती याचाही उलगडा त्यांच्या लिखाणातून झाला.

### मार्क्सवादी स्त्रीवादावरील टीका

१. **ॲलिसन यागर** यांच्या मते, ''मार्क्सवादी स्त्रीवाद्यांनी वर्गीय शोषणाला महत्त्व देऊन लिंगभेदाकडे वर्गीय विषमतेचे प्रतीक म्हणून पाहिले. त्यामुळे लिंगभेदामुळे होणाऱ्या शोषणाकडे कधीच महत्त्वाचा मुद्दा म्हणून पाहिले नाही.

२. पुनरुत्पादन (वंशसातत्य), स्त्रियांविरुद्ध अत्याचार यासंबंधित विषयांकडे मार्क्सवादी स्त्रीवाद दुर्लक्ष करतो.

३. ब्लॅकबर्न व स्टुअर्ट यांच्या मते, प्रस्थापित समाजव्यवस्थेत जास्तीतजास्त स्त्रिया अर्थार्जन करू लागल्यामुळे स्त्री-पुरुष समानता निर्माण न होता त्यांचा दर्जा आहे तसाच राहिला. स्त्री कामगारांची संख्या वाढली. परंतु स्त्रिया कामगार संघटनेत सहभागी न झाल्याने भांडवलदारांचाच फायदा झाला.

४. नोकरी करणाऱ्या स्त्रियांची आई व गृहिणी या भूमिका बदलल्या नाहीत. त्यामुळे नोकरीबरोबर परंपरागत कामे त्यांना करावीच लागतात.

५. स्त्रिया व पुरुष समान पातळीवर काम करू लागली तरी अंतिम निर्णयांचे अधिकार पुरुषांकडेच राहिले. त्यामुळे स्त्रियांना समान अधिकार मिळालाच नाही.

### समाजवादी स्त्रीवाद (Socialist Feminism)

स्त्री-पुरुष जुलूम सिद्धांतामधील समाजवादी स्त्रीवाद हा महत्त्वाचा विचार मांडला जातो. राजकीय डाव्यांशी युती केलेल्या स्त्रीवाद्यांनी मार्क्सवादी आणि समाजवादी या संज्ञा एकमेकांना पर्याय म्हणून वापरल्या पण **रोजमरी टाँग** यावर टीका करताना म्हणतात, ''स्त्रीवाद्यांच्या अंतर्गत असणाऱ्या दोन भिन्न प्रवृत्तींचे प्रतिनिधित्व या दोन्ही संज्ञा करतात. मार्क्सवादी विचारांमध्ये असणाऱ्या लिंगभाव आंधळेपणामुळे असंतुष्ट असणाऱ्या मार्क्सवादी स्त्रीवाद्यांचे समाजवादी स्त्रीवाद्यांमध्ये रूपांतर झाले.''

स्त्रियांच्या सध्याच्या सामाजिक व आर्थिक स्थितीला 'वर्गवाद' जबाबदार आहे असे मार्क्सवादी मानतात तर समाजवादी स्त्रीवाद्यांनी लिंगभेद व वर्गवाद या दोहोंकडे समानरित्या सशक्त असणाऱ्या शोषणाच्या यंत्रणा म्हणून पाहिले व लिंगभेद आणि पुनरुत्पादन यावर प्रकाश टाकला.

**इमेल्डा व्हेलहन** यांनी मार्क्सचे मूळ विचार आणि स्त्रीवादी विश्लेषण यातील

वाढत जाणारी दरी यांना स्पष्ट करणारी संज्ञा म्हणजे 'समाजवादी स्त्रीवाद' असे मानले. समाजवादी स्त्रीवादाने स्त्रियांच्या शोषणाचे स्वरूप वैश्विक करता यावे म्हणून झगडा दिला व पुरुषशाही या संज्ञेतून ध्वनित होणाऱ्या अमूर्त अनैतिहासिक अर्थावर हल्ला चढविला. त्यांच्या मते, पाश्चिमात्य समाजरचनेच्या आर्थिक व सैद्धांतिक रचनेत पुरुषशाहीचेच वर्चस्व आहे. बाजारपेठेत काम करणाऱ्या स्त्रिया इतरांपेक्षा वेगळे राहून काम करतात. या ठिकाणी त्यांना पुरुषांपेक्षा कमी सत्ता, संपत्ती व आराम उपलब्ध असतो.

समाजवादी विचारप्रवाहाने, ''मार्क्सवादी सिद्धांत स्त्रीप्रश्नांचे विश्लेषण करताना अपुरा पडतो व समाजवादी क्रांतीनंतर स्त्री-मुक्ती आपोआप घडेल हे गृहीत धरतो'' असा आक्षेप मांडून उदारमतवाद व मार्क्सवाद यांचा संगम आपल्या मांडणीत करण्याचा प्रयत्न केला. या परंपरेतील ज्युलिएट मिचेल यासारख्या विचारवंतांनी जहाल स्त्रीवादातील काही महत्त्वाच्या संकल्पना व विचार आत्मसात करून त्यांना आपल्या उदारमतवादी मार्क्सवादाशी जोडण्याचा प्रयत्न केला. ज्युलिएट मिचेलने कुटुंब या संस्थेतील उत्पादन, पुनरुत्पादन, लैंगिकता व मुलांवरील संस्कार प्रक्रिया या चार संरचनांचे वर्णन करून त्यामध्ये बदल झाला पाहिजे असे मत मांडले आहे. केवळ खाजगी संपत्तीचे उच्चाटन झाले व स्त्रिया सार्वजनिक जगात, उद्योगधंद्यांमध्ये सहभागी झाल्या की त्यांच्या दुय्यम स्थानाचे प्रश्न संपत नाहीत तर त्यासाठी कुटुंबाची संरचना आमूलाग्र बदलावी लागेल असे तिला वाटते. फ्रॉईडच्या सिद्धांताचा आधार घेऊन समाजवादी समाजरचनेतील स्त्रियांचे स्थान दुय्यम राहते. स्त्रियांचा न्यूनगंड म्हणजेच स्वतःला दुय्यम मानण्याची वृत्ती हे एक अटळ वास्तव आहे असे मत फ्रॉइडने मांडले आहे. तसेच कुटुंबव्यवस्था चालू राहण्यासाठी मुलामुलींची मानसिक जडणघडण लहानपणापासूनच तयार केली जाते असे मत ज्युलिएट मिचेलने मांडले. समाजवादी स्त्रीवादाची मांडणी करण्याचे प्रयत्न अनेक स्त्री-विचारवंतांनी केले. आजवर झालेली स्त्री-पुरुषांची वेगळी जडणघडण ही नैसर्गिक नसून हे पुरुषशाही व्यवस्थेचे कडवट फळ आहे. त्यामुळे पुढील काळात मुले आणि मुली वाढवताना स्त्री आणि पुरुष अशी दुभंगलेली व्यक्तिमत्त्वे तयार न करता त्यांच्यावर माणूस म्हणूनच संस्कार झाले पाहिजेत यावर त्यांनी भर दिला. त्यामुळेच स्त्री आणि पुरुष यांचा उत्पादन व्यवस्थेतील सहभाग माणूस या नात्याने असला पाहिजे व त्या दृष्टीने कामाचे वाटप झाले पाहिजे असे त्यांना वाटते. त्यामुळेच वर्गव्यवस्था नष्ट होण्यासाठी सामाजिक क्रांतीची तर पुरुषशाही नष्ट होण्यासाठी मानसिक क्रांतीची गरज आहे असे मिचेल यांचे मत आहे.

### समाजवादी सिद्धांताचे दोन दृष्टिकोण

**१. दुहेरी व्यवस्था सिद्धांत :** हा सिद्धांत असे मानतो की, स्त्रियांचे शोषण

समजावून घेण्यासाठी पुरुषशाही आणि भांडवलशाही यांचा स्वतंत्र प्रक्रिया म्हणून विचार करावा लागेल. एका दृष्टिकोणानुसार पुरुषशाही व भांडवलशाही यांना भौतिक पाया असतो. **हायडी हार्टमन** (Heidi Hartmann) यांच्या मते, पुरुषशाही म्हणजे स्त्रियांवर असणारे नियंत्रण. ते या तीन गोष्टीतून केले जाते. (१) श्रमशक्ती (२) लैंगिकता (३) पुनरुत्पादन.

तर दुसऱ्या दृष्टिकोणानुसार भांडवलशाहीचा भौतिक पाया तपासला जातो आणि पुरुषशाही ही मानसिकता आहे असे मानून पुरुषशाहीला Super Structure मध्ये ढकलले जाते. भांडवलशाहीपासूनच कुटुंबाच्या 'आत' आणि 'बाहेर' हे कोटीक्रम अस्तित्वात आले. त्यामुळे भांडवलशाही हीच कुटुंबव्यवस्था व अर्थव्यवस्था यातील दरी तीव्र करण्यास जबाबदार आहे.

२. **एकेरी व्यवस्था सिद्धांत** : हा सिद्धांत असे मानतो की, पुरुषशाही व भांडवलशाही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. दोहोंत निश्चित फरक करता येणार नाही.

**आयरिस यंग** (Iris Young) यांच्या मते, ''लिंगभावाधारित श्रमविभागणी या संकल्पनेमुळे मार्क्सवादी सिद्धांताचे समाजवादी, स्त्रीवादी सिद्धांतात रूपांतर होते. त्यांच्या मते, स्त्रियांना परिघाबाहेर ढकलणे आणि त्यामुळे त्यांच्या कामाचा दुय्यम शक्ती म्हणून वापर होणे हे आवश्यक आणि मूलभूतरित्या भांडवलशाहीचे वैशिष्ट्य आहे. तसेच श्रमविभागणीवर आधारित विश्लेषण हे वर्ग विश्लेषणाला पूरक नाही तर त्याचा पर्याय आहे.

## समाजवादी स्त्रीवादाने स्त्री-पुरुष समानतेसाठी सुचविलेले उपाय

स्त्रियांचे शत्रू पुरुष असल्याने जर समाजवादी तत्त्वानुसार स्त्रीविषयक समानता निर्माण व्हावयाची असेल तर स्त्रियांना योग्य अधिकार मिळवून दिले पाहिजेत. त्यासाठी पुढील उपाय सुचविले.

१. स्त्रियांनी एकाच वेळी भांडवलशाही व पुरुषसत्ताक पद्धतीविरुद्ध आवाज उठवावा.

२. स्त्रियांच्या विविध प्रश्नांवर स्वतंत्र चळवळी निर्माण व्हाव्यात. त्यामध्ये घातक प्रथा, परंपरा, अधिकार, हक्कांची जाणीव यांचा समावेश असावा व या चळवळी विद्यार्थी व कामगार चळवळींशी जोडल्या जाव्यात.

३. पितृसत्ताक कुटुंबपद्धतीच नष्ट करावी.

थोडक्यात, समाजवादी स्त्रीवाद्यांनी स्त्रियांवरील जुलूम कमी करून स्त्री-पुरुष समानतेसाठी विविध उपाय सुचविले. भांडवलशाही व पितृसत्ताक पद्धती स्त्रियांचे

दमन व शोषण करते हे थांबवण्यासाठी स्त्रियांनी पुरुष वर्गाविरुद्ध उठाव करून स्वतंत्र चळवळी उभाराव्यात असे मत मांडले.

## जहाल स्त्रीवाद (Radical Feminism)

साठाच्या दशकापासून सत्तरच्या मध्यापर्यंत स्त्रियांची चळवळ 'आतले' आणि 'बाहेरचे' अशा गटांत विभागली गेली. आतल्या गटात मवाळांचा समावेश होता तर जहाल समाजवादी स्त्रीवादी यांचा समावेश असणारा बाहेरचा गट होता. १९८० च्या दशकाच्या उत्तरार्धात जहाल स्त्रीवादी पुढे आले. विद्यार्थी आणि नागरी हक्कांच्या चळवळीसारखे जहाल स्त्रीवादी राजकारण शिगेला पोहोचले असताना जहाल स्त्रीवादाचा विकास झाला. राजकीय विचारांच्या कोणत्याही एका परंपरेचे पारंपरिकत्व जहालवादाने स्वीकारले नाही. सुरुवातीपासूनच जहाल स्त्रीवाद तुकड्या-तुकड्यांमध्ये सुट्या स्वरूपात होता. जहाल स्त्रीवादाने उदारमतवादी व मार्क्सवादी विचारसरणीला आव्हान उभे केले.

या विचारसरणीनुसार प्रस्थापित समाजातील स्त्रियांच्या वाईट स्थितीला पुरुषच जबाबदार आहेत असे मत मांडण्यात आले आणि प्रत्येक स्त्रीला स्वतःचा आवाज आहे आणि प्रत्येक काम स्वतंत्ररित्या केले जाऊ शकते असाही विचार पुढे आला. असे विचार मांडणाऱ्या छोट्या-छोट्या गटांची निर्मिती त्यांनी केली व त्यातून जाणीव जागृतीची स्वतःची तंत्रे विकसित केली.

## जहाल स्त्रीवादी तत्त्वे

ऐतिहासिकदृष्ट्या स्त्रियांचे शोषण हे सर्वांत प्रथम झाले आणि सर्वांत जास्त व्याप्ती असणारे शोषण म्हणून त्याकडे पाहता येते. हे शोषण इतर शोषणाला चौकट पुरविते. अशा शोषणाला स्त्रिया बळी पडतात. पण स्वतः मात्र त्या या शोषणाबाबत अज्ञानी व अनभिज्ञ असतात.

## जहाल स्त्रीवाद्यांनी हाताळलेले विषय

**पुनरुत्पादन / वंशसातत्य :** शुलामिथ फायरस्टोन यांनी १९७३ मध्ये 'द डायलेक्टीक ऑफ सेक्स' (लैंगिक व्यवहाराची द्वंद्वात्मकता) हे पुस्तक लिहिले. यामध्ये समाजाचा इतिहास हा वर्ग संघर्षाचा इतिहास नसून तो लिंगामधील (स्त्रीलिंग व पुल्लींग) संघर्षाचा इतिहास आहे. समाजातील मूलभूत वर्गीय विभाजन सांगताना ती म्हणते, आर्थिक वर्ग हे दुय्यम आहेत तर पुरुषपणा व बायकीपणा या समजुतीतून सर्वांनी बाहेर पडावयास हवे. तिच्या मते, मूलभूत वर्गीय विभाजन आणि दडपणूक ही लैंगिकतेच्या आधारे केली जाते. यासाठी भौतिकवाद व द्वंद्वात्मकता या संकल्पना मांडल्या. स्त्रियांच्या शोषणाची मुळे ही स्त्री आणि पुरुष यांनी वंशसातत्यात

VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
Accn. No. 9622
U.G.C. LIBRARY


बजावलेल्या भूमिकांमध्ये आहे. परंतु या विवेचनाचा शेवट शारीरिक / जैविक क्रांतीनंतर हे शोषण संपुष्टात येईल या विधानात होतो.

आपले विश्व म्हणजे कधीही सुसंवाद साधू न शकणाऱ्या संपूर्णतः परस्परविरोधी क्रिया व प्रतिक्रिया यांच्या नैसर्गिक प्रवाहांची प्रक्रिया असते. आपला हा सिद्धांत भौतिकवादीच आहे हा तिचा दावा आहे. आर्थिक वर्ग व राजकीय समाज यांच्या जडणघडणीचे मूळ तिने सेंद्रिय ऊर्फ नैसर्गिक कारणात शोधले. म्हणून आपण जे मानस धारण करतो ते व जे लैंगिक विश्व उभे करतो ते एक निखळ भौतिक वास्तवच असते असे तिला वाटते. शारीरिकतेवर आधारित असलेली आजची कुटुंबव्यवस्थाच लैंगिक विषमता व वर्गव्यवस्था निर्माण करते. म्हणूनच लैंगिक विग्रह, स्त्रीत्व व पुरुषत्व या साचेबंदपणाचे उच्चाटन हा जहाल स्त्रीवादाचा अंतिम हेतू आहे.

अजिजा-अल्-हिब्री (Aziza-Ul-Hibri) फायरस्टोनवर टीका करताना म्हणतात, "ज्यामुळे पुरुष स्त्रियांवर अवलंबून आहेत असा घटक म्हणजे स्त्रियांची वंशसातत्याची भूमिका होय. ती भूमिका सोडून देण्याचे तोटे फायरस्टोन यांनी लक्षात घेतलेले नाहीत."

**मातृत्व** : फायरस्टोन शुलमिथ (Firestone Shulamith) यांच्या मते, 'पुरुष-सत्ताक समाजात 'वारसा' चालविणे या विशिष्ट कारणासाठीच अपत्य हवे असते. यातूनच पुरुषसत्ताक समाजात तीन प्रकारची मिथके तयार होतात. त्यात प्रत्येक स्त्रीस अपत्य हवे. प्रत्येक स्त्रीस मातृत्वाचा उमाळा उपजतच असतो व प्रत्येक अपत्याला आईचीच गरज असते. त्यामुळे या मातृत्वाच्या बंधनात स्त्री स्वतःला बांधून ठेवते असे जहालवादी स्त्रीवाद्यांना वाटते.

**लैंगिकता व राजकारण** : वरील सामाजिक मिथके व रचितामुळेच स्त्रियांचे सत्त्व व वर्तन नियंत्रित राहते. स्वतःच्या इच्छा व गरजा ओळखून त्यांना स्वतःचा विकास करता येत नाही. पुरुष हे निसर्गतः आक्रमक व वर्चस्ववादी असतात तर स्त्रिया या निसर्गतः निष्क्रिय आणि आज्ञाधारक असतात असे गृहीत धरून पुरुषी हिंसेला विशेषतः स्त्रियांविरुद्धच्या लैंगिक हिंसेला विधिवत व नैसर्गिक रूप दिले जाते. ही प्रमाणके सर्वच बाबतीत वापरली जातात. जोपर्यंत अशा संबंधामध्ये स्त्री व पुरुष समान पातळीवर येत नाहीत तोपर्यंत स्त्री ही राजकीय, सामाजिक व आर्थिक क्षेत्रांत पुरुषांबरोबर येणार नाही.

लिंगभाव व्यवस्थेविषयी सैद्धांतिक पातळीवरून बोलणारी पहिली स्त्रीवादी म्हणजे केट मिलेट होय. तिने **'सेक्सुअल पॉलिटिक्स'** (Sexual Politics - लैंगिकतेचे राजकारण) या पुस्तकात आपली मते मांडली आहेत. तिच्या मते, पुरुषांचे स्त्रियांवर असणारे लैंगिक वर्चस्व हे पाश्चात्त्य समाजातील पुरुषी वर्चस्वाचे

RUPA... YRA...

महत्त्वाचे कारण आहे. या व्यवस्थेची प्रमुख संस्था कुटुंब ही आहे. पुरुषी सत्ता टिकविण्यासाठी कुटुंबामध्ये योग्य संस्कार करण्याची जबाबदारी स्त्रियांवर येते. तसेच पितृनिश्चितीखेरीज मुलांचा जगण्याचा अधिकार नाकारला जातो. त्यामुळे अशा मूल्यावस्थेतून पुरुषी वर्चस्वाला अधिसत्ता मिळते.

पुरुषांच्या मनात स्त्रियांविषयी असणारी वर्चस्वाची, स्वामित्वाची, क्रौर्याची भावना, लैंगिक विकृतीने भरलेल्या मासिकातून व त्यांच्या भाषेतून स्पष्ट होते. जहाल स्त्रीवाद्यांच्या मते, "सर्वच स्त्रियांचा एकत्रित दडपलेला वर्ग असतो. कोणत्याही वर्गातील स्त्रियांना आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय स्तरांवर पुरुषांव्यतिरिक्त स्थान नसते."

जर्मेन गिअर (Germaine Greer) हिने **'द विमेन युनक'** या पुस्तकात स्त्रियांची लैंगिकता खऱ्या अर्थाने कशी नाकारली गेली आहे याचे विवेचन केले आहे. छोट्या व विभक्त कुटुंबात स्त्रियांची अधिकच कोंडी व दडपणूक होते आणि ती एकाकी होऊन खोट्या स्त्रीत्वाच्या प्रतिमेखाली चेंगरून जाते. म्हणूनच विभक्त कुटुंबाऐवजी सामूहिक कुटुंबाची संकल्पना तिने मांडली आहे. यासाठी जहाल स्त्रीवाद्यांनी लैंगिक क्रांतीची मागणी केली. त्यांच्या मते, जेव्हा स्त्रीवादी क्रांती होईल तेव्हा -

१. स्त्रिया मातृत्वाच्या जबाबदारीतून मोकळ्या होऊन अपत्य संगोपनाचे काम सामूहिकरित्या समाजामार्फत होईल.

२. संपत्तीची समान वाटणी झाल्याने स्त्रियांच्या व मुलांच्या आत्माविष्काराला व व्यापक समाजबांधणीला पूर्ण वाव मिळेल.

३. लैंगिकतेचा व्यवहार साचेबंदपणातून मुक्त होईल. यासाठी पितृसत्ताक समाजव्यवस्था उलथून टाकली पाहिजे. प्रत्येक स्त्रीने सबला म्हणून स्वतःची स्वतंत्र मानसिक जडणघडण केली पाहिजे. पुरुषी वर्चस्व असलेली पितृसत्ताक पद्धती उलथून टाकण्याचा जहाल क्रांतिकारी विचार जहाल स्त्रीवाद्यांनी मांडला.

४. जहाल स्त्रीवाद्यांचे स्त्रीवादाला सर्वांत मोठे योगदान म्हणजे त्यांनी विकसित केलेली व अमलात आणलेली जाणीवजागृतीची संकल्पना होय. "जे जे खाजगी ते ते राजकीय' ही त्यांची प्रसिद्ध घोषणा होती. ही संकल्पनाच हेच त्यांचे या प्रश्नावरील स्त्रीवादी उत्तर होते. खाजगी, व्यक्तिगत समजल्या जाणाऱ्या वर्तुळातील अनुभव हे व्यवसायात्मक दुय्यमत्व दिल्या गेलेल्या स्त्रियांचे विशिष्ट अनुभव म्हणून समजावून घेणे हा त्याचा अर्थ होय. म्हणजेच स्त्रियांच्या परिस्थितीचे राजकारण समजावून घेण्यासाठी स्त्रियांचे व्यक्तिगत जीवन विशेषतः लैंगिक जीवन समजावून घेणे आवश्यक आहे असे त्यांना वाटते. खाजगीचे राजकीयीकरण करण्यात जाणीवजागृती ही मध्यवर्ती

प्रक्रिया होती. त्याचा उद्देश केवळ स्त्रियांच्या समाजातील दुय्यम भूमिकेमुळे निर्माण होणाऱ्या विषमतेविरुद्ध त्यांच्यात जागरूकता निर्माण करणे एवढाच नव्हता तर त्यामुळे स्त्रियांना स्वतःच्या खाजगी व भावनिक जीवनाचे पुनर्मूल्यांकन करण्यासाठी त्यांच्या कुटुंबाशी असणारे, कामाच्या ठिकाणी असणारे संबंध तपासण्यासाठी प्रोत्साहन मिळाले. आपले शोषण होत आहे याची जाणीवजागृती होऊन त्याविरुद्ध असंतोष व्यक्त करणे शक्य झाले. यामुळेच कौटुंबिक जीवनाशी निगडित असणाऱ्या स्वतःच्या ओळखीपलीकडे जाऊन स्वतःची स्वायत्त ओळख शोधण्यासाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षासाठी अवकाश मिळाला. त्यामुळे स्त्रियांच्या खाजगी बाबी सार्वजनिक जीवनाशी निगडित असतात हे विचार पुढे आले.

### जहाल स्त्रीवादावरील टीका

जहाल स्त्रीवाद अनैतिक आहे. त्याला इतिहासाची जाणीव नाही. तसेच स्त्रिया या पुरुषांपेक्षा श्रेष्ठ आहेत हे गृहीत धरूनच जहाल स्त्रीवाद्यांनी आपल्या सिद्धांताची रचना केली व त्यास अनुसरून स्त्री-पुरुष भेद स्पष्ट केला जातो. त्यामुळे जहाल स्त्रीवाद एकांगी विचार मांडणारा आहे व पुरुषांना हा विचार दुय्यम ठरवितो अशी टीका या विचारप्रवाहावर झाली.

## उत्तर आधुनिकतावादी स्त्रीवाद (Post-Modernist Feminism)

**अर्थ :** उत्तर आधुनिकतावाद म्हणजे आधुनिक काळातील प्रस्थापित रूढी आणि जीवनमार्ग यांना आव्हान. (Challenges to the traditional & settled way's of life). १९७० च्या दशकात उत्तर आधुनिकवाद ही संज्ञा प्रचारात आली. १५ जुलै, १९७२ रोजी दुपारी ३ वाजून ३२ मिनिटांनी सेंट लुईसमधील कमी उत्पन्न असलेल्या गटांच्या लोकांसाठी बांधलेली वसाहत उडवून देण्यात आली. यामागे गरिबांना श्रीमंतांच्या बरोबरीने राहण्याचा हक्क मागणे हा उद्देश होता. या घटनेने आधुनिकता-वादाचा प्रतिकात्मक अंत झाला आणि उत्तर आधुनिकतेचा मार्ग मोकळा झाला असे म्हटले जाते. म्हणजेच ही संकल्पना प्रथम वास्तुशास्त्राच्या आधुनिकतेच्या संदर्भात वापरली गेली व नंतर ती मानसशास्त्र व समाजशास्त्रात वापरली जाऊ लागली.

**युगाचा शेवट :** पोस्ट मॉर्डनिझम्, पोस्ट कॅपिटॅलिस्ट, पोस्ट कोलोनिअल, पोस्ट लिटरेचर, पोस्ट स्ट्रक्चरल अशा शब्दांतून पाश्चात्त्य विचारवंतांना एक प्रकारच्या अंताची (सेन्स ऑफ ॲन एंडिंग) जाणीव झाली होती आणि आपण एका वेगळ्या युगात प्रवेश करत आहोत असे वाटत होते. या अर्थाने आधुनिक युगाचा अंत होऊन आता उत्तर आधुनिक युगाला सुरुवात झाली आहे. सत्तर आणि ऐंशीच्या दशकात उत्तर आधुनिकतावाद व उत्तर वसाहतवाद या दोन्ही कल्पना प्रचारात आल्या आणि त्यांचे सिद्धांत बनले.

दुसऱ्या महायुद्धानंतर झालेल्या यूनोच्या स्थापनेने, शीतयुद्धाने जग जवळ आले. व्यापाराने राष्ट्राराष्ट्रांतील सीमा ओलांडल्या. वाहतुकीची साधने विस्तारली. जागतिकीकरणाला गती मिळाल्याने राष्ट्राराष्ट्रांतील सीमा जवळ आल्या. जगातील भिन्न समाज परस्परांच्या जवळ आल्याने भिन्न संस्कृती एकत्र येऊन एक व्यामिश्र स्वरूपाची संस्कृती उदयाला आली. यामध्ये आकाशवाणी, दूरदर्शन, सिनेमा, छायाचित्रे, व्हिडिओ कॅमेरा, वृत्तपत्रे, नियतकालिके प्रामुख्याने संगणक यामुळे जगातील सर्व समाज प्रकाशझोतात आले. त्यातूनच नवी जागतिक संस्कृती निर्माण झाली. यातूनच चिरंतन सत्यावरील निष्ठेचा ऱ्हास, सर्व विद्याशाखांचे विभाजीकरण आणि विभिन्न दृष्टिकोणांचा उदय या सर्व ज्ञानशाखांतून झाला. फ्रान्समधील **जीन फ्रॅं. लिओटार्ड** (Jean Francois Lyotord), **जीन बॉद्रीलॉर्ड** (Jean Baudrilard) यांनी उत्तर आधुनिकतावादी लेखक म्हणून मान्यता मिळाली. अर्थात, या सर्वांच्यावर मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा प्रभाव होता हे नाकारता येत नाही. **फ्रेडरिक जेमसन** (Fredrick Jameson) या अमेरिकन मार्क्सवादी विचारवंताने 'Post Modernism or the Cultural Logic of Late Capitalism' या लेखात २० व्या शतकाच्या उत्तरार्धातील पाश्चात्त्य समाजाबाबतचे चिकित्सक विश्लेषण केले. या सर्व विचारवंतांनी आधुनिकोत्तर जगासंबंधी वेगवेगळ्या प्रकारांनी भाष्य केले.

उत्तर संरचनावाद उत्तर आधुनिकतावादाचे संभाषित (डिस्कोर्स) म्हणजेच त्याविषयी चर्चा आहे. उत्तर आधुनिकतावादात भाषेला महत्त्व आहे. भाषेचे नियंत्रण कसे असते, ती अर्थाचे नियमन कसे करते, या नियंत्रणाचा आपण भाषेच्याद्वारा कसा उपयोग करतो, भाषा सर्व जीवनावर मर्यादा कशी घालते या सगळ्यांचा अंतर्भाव उत्तर आधुनिकतावादात होतो. यामुळे अशी भाषा आपलीही विशिष्ट ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक साच्यात व्याख्या करते.

## स्त्रीवादी संकल्पना

उत्तर आधुनिकतावादात वंश, वर्ग, लिंग, राष्ट्रीयत्व, भिन्न वंशीयता इत्यादींचा समावेश होतो. तसेच इतिहास या ज्ञानशाखेच्या संदर्भात सत्ताहीनता, लिहिलेले, न लिहिलेले, सांगितलेले, मुद्दाम न सांगितलेले असे अनेक विषय उत्तर आधुनिकवादाचे चिंताविषय आहेत. इथेच इतिहासातील स्त्रियांचे विषय मुद्दामच दुर्लक्षिले गेले आहेत का ? याकडे लक्ष देणे गरजेचे आहे, असे उत्तर आधुनिकतावादी स्त्रीवाद्यांना वाटते. म्हणजेच उत्तर आधुनिकतावादी विचारसरणी ही एकूण त्या विषयीची (सिस्टिम ऑफ रायटिंग) साशंकता निर्माण करते.

वैश्विक किंवा परिणत भांडवलशाही यामुळे वैश्विक संबंधाच्या संकल्पनांमध्ये बदल झाला आहे. आधीचे वसाहती करणारे देश यांचे पहिले जग, दुसरे समाजवादी

जग व ज्यांचे वसाहतीकरण झाले आहे असे तिसऱ्या जगातील देश यांतील भिन्नताही शंकास्पद ठरली आहे. पूर्वीच्या तिसऱ्या जगातील काही भाग आता जागतिक अर्थव्यवस्थेत विकसित म्हणून संबोधले जातात तर दुसरे जग म्हणजे समाजवादी जग भूतकाळात जमा झाले आहे. वैश्विक भांडवलशाहीच्या परिणामामुळे हे सारे घडून आले. १९८० च्या दशकात तिसऱ्या जगातील संघर्ष उघड होऊ लागला. भांडवलवादी आधुनिकता, युरोप केंद्रित सांस्कृतिक मूल्ये आणि राजकीय आकृतिबंध हे समीकरण आता बदलले आहे. आंतरराष्ट्रीय भांडवलशाही, संस्कारीत सामाजिक आणि सांस्कृतिक रचनांमुळे हे समीकरण बदलले आहे. भांडवलशाही-वसाहतीकरण-साम्राज्यवाद अशी ही प्रक्रिया होती. भांडवलशाहीच्या स्वरूपामुळे साम्राज्यवादाचे स्वरूपही बदलले. याचे उदाहरण म्हणजे पूर्वीच्या तिसऱ्या म्हटल्या गेलेल्या जगतात - भारततही आर्थिक, सामाजिक प्रश्नांबरोबरच सांस्कृतिक प्रश्नही निर्माण झाले. ते इथल्या लिखाणातून भाषांमधून व्यक्त होऊ लागले. यावरून संकल्पना बदलल्या की, इतिहासलेखनाची दिशा बदलते.

आज युरो केंद्रित सर्व बीज आख्याने (matter narratives) कोलमडून पडली आहेत. ज्ञानाचा संबंध सत्याशी नाही तर तो सत्तेशी आहे हे इतिहास अभ्यासासाठी महत्त्वाचे ठरले. उत्तर आधुनिकतावाद ही संकल्पना आंतरशाखीय वादग्रस्त व गुंतागुंतीची आहे. ती आधुनिकतावादाविरुद्धची भक्कम प्रतिक्रिया आहे. याचे वैशिष्ट्य म्हणजे प्रस्थापित परंपरांना व प्रस्थापित आधुनिक जीवनमार्गाला या कल्पनेने आव्हान दिले. आधुनिकतावादात बुद्धीचे महत्त्व, सुनियंत्रितपणा, आधुनिक नैतिकता, कायदा सुव्यवस्था आहे. या सर्वांचा शेवट म्हणजे उत्तर आधुनिकतावाद होय. तुम्ही ज्यास सत्य मानता ते योग्य कसे ?

## उत्तर आधुनिकतावादी स्त्रीलेखन

या कल्पनेतूनच 'काळ्यामध्येही सौंदर्य आहे' (Black is Beautiful) ही कल्पना पुढे आली व काळ्या स्त्रीवादाचा उदय झाला. काळ्या स्त्रीवादाने असा आरोप केला की, स्त्रीवादी चळवळीने विकसित केलेले पद्धतीशास्त्र (Methodology) ही गोऱ्या भिन्नलिंगी व मध्यमवर्गीय स्त्रियांच्या अनुभवावर आधारित आहे. यामुळे काळ्या स्त्रियांच्या संदर्भात जाणीवजागृती होऊ लागली व गोऱ्या स्त्रीवाद्यांच्या अधिसत्तेमध्ये हस्तक्षेप करण्यासाठी उपयुक्त विषय त्यांना मिळाले.

१९७४ मध्ये ब्रिटनमध्ये काळ्या स्त्रियांचा गट स्थापन झाला. १९८० च्यां शेवटी त्यांनी काळ्या स्त्रियांचे एक केंद्र स्थापन केले. यामध्ये अमेरिका व ब्रिटनमधील स्त्रियांनी वांशिकतेच्या आणि लिंगभेदाच्या मुद्द्यांवर एकत्र आले पाहिजे यावर भर दिला. यातून त्यांच्या विशिष्ट मागण्या पुढे येऊन काळ्या स्त्रियांची मुक्ती आकाराला येईल अशी आशा त्यांना वाटू लागली.

फुकोच्या थेअरीने प्रभावित होऊन डेल्युझे (Deleuze) आणि इरीगॅरे (Irigaray, 1985) या उत्तर आधुनिकतावादी स्त्रीवाद्यांनी शरीर आणि लिंगभावाची व्यक्तिनिष्ठता यावर आपली लेखनपद्धती तयार केली. इरीगॅरे ह्यांनी पुरुषसत्ताक संस्कृती व स्त्रियांचा पुरुषांपेक्षा 'इतर' म्हणून झालेल्या उल्लेखावर आपल्या सिद्धांताची उभारणी केली. यानंतर ग्रोस (Grosz, 1994) यांनी स्त्री शरीराच्या भौतिकवादी उपयोगावर भर दिला तर बटलर यांनी मिशेल फुको (Michel Foucault) मानसशास्त्रीय विश्लेषणाचा आधार घेऊन स्त्रीशरीराचा भौतिकवादी सिद्धांत मांडला. यानंतर गॅलॉप (Gallop, J. 1998) यांनी शरीर व संस्कृती या दोन्ही दृष्टीने स्त्रियांच्या केलेल्या विरोधाला आव्हान दिले व स्त्रियांनी पुरुषसत्ताक पद्धतीला केलेल्या विरोधाबद्दल मत मांडले.

थोडक्यात, उत्तर आधुनिकतावादी स्त्रीवाद्यांनी परंपरागत पुरुषसत्ताक पद्धतीच्या सत्तासाधनाला म्हणजेच धर्मशास्त्रे व निसर्ग यांना विरोध केला. तसेच त्यांनी अनुभवाच्या सार्वभौमत्वाला स्त्रीज्ञानविषयक सिद्धांतातून विरोध करून जे जे खाजगी असते ते ते राजकीय मानले. फुकोच्या विचारसरणीचा धागा पकडून त्या म्हणतात, 'सत्ता व ज्ञान एकमेकांच्या हातात हात घालून जाते. जे एकांगी व अपूर्ण असते. त्यामुळे काहींचेच हितसंबंध जपले जातात. त्यामुळे कोणत्याही गोष्टींचे मूल्यमापन हे अशा सत्याच्या संदर्भात न होता जगावर झालेल्या परिणामांच्या संदर्भात घ्यावेत.'

यामागे समाजाच्या स्त्रीविषयक विशिष्ट धारणा, त्यामागील हेतू, त्या धारणांची विचारणा व पूर्व मांडणी करणे, स्त्रियांना मुख्य प्रवाहापासून दूर ठेवू पाहणाऱ्या व्यूहांमधून स्त्रियांना सोडविणे हे स्त्रीमुक्ती चळवळीचे व उत्तर आधुनिकतावादी स्त्रीविषयक इतिहासलेखनाचे मूळ उद्दिष्ट आहे.

स्त्री ही एक व्यक्ती आहे. स्वतःचे विचार, भावना व्यक्त करू शकणारे ते एक अस्तित्व आहे. जगाच्या रचनेत व तिच्यावर सोपवण्यात आलेल्या कार्यात ती सहभागी असते. तिच्यातील स्वतंत्र वैशिष्ट्यांमुळे (पुनर्उत्पादन व संगोपन) समाजाचा घटक म्हणून तिला महत्त्व असते. स्त्री हा शब्द काही सामाजिक, राजकीय व जीवशास्त्रीय तथ्यांशी निगडित आहे. स्व-लिखाणातून, अनुभवातून तो कसा व्यक्त होतो हे पाहणे हे स्त्रीवादीलेखनाचे उद्दिष्ट असावे.

समाजजीवनाच्या संकल्पना बदलल्या की इतिहासलेखनाची संकल्पना बदलते. आता बीज आख्याने बदलली आहेत. यादव काळातील 'मानसिक रुग्ण स्त्रियांची अवस्था' किंवा 'मराठेकालीन वेड्या स्त्रिया' असे न हाताळलेले विषय इतिहासलेखनाचे विषय बनू शकतात. फक्त काळ्याच नव्हे तर अन्य वंशांच्या, जमातींच्या स्त्रियांच्या विशिष्ट गरजा हा आणखी महत्त्वाचा मुद्दा होऊ शकतो. ब्रिटिश कालखंडातील अधिकाऱ्यांकडून आशियाई स्त्रियांना मिळणारी वागणूक किंवा इतर अनेक दुर्लक्षित बाबींमुळे गतकाळाचे परीक्षण करण्याची गरज निर्माण झाली आहे. ◆◆◆